# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०५/०५/२००५

दि. १३/०४/२००५ रोजीची वेळेअभावी तहकुब झालेली सभा आज दि. ०५/०५/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०१, दि. ०५/०४/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ५) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ९) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २१) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २२) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २३) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २४) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २५) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २६) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २७) | श्री. माळी रविंद्र भीमदेव | गटनेता |
| २८) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २९) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर<br>उर्फ<br>शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३०) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३१) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३२) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३३) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३४) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ३५) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३६) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३८) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३९) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४०) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४१) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ४२) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ४४) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४५) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ४६) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ४७) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ४८) | श्री. पाटील ध्रुवकिशोर | सदस्य |
| ४९) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५०) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५१) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५२) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५४) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५५) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ५६) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५९) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ६०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ६१) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६२) | श्री. पाटील रोहिदास आत्माराम | सदस्य |
| ६३) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ६४) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६६) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६८) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्ष नेता |
| २) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ३) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ४) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| ५) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ६) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| ७) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ८) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ९) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १०) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ११) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| १२) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्या |
| १३) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| १४) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| २) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की काल जी मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रभाग समितीची निवडणुक पार पडली. त्या निवडणुकीत प्रभाग समिती क्र. १ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख, प्रभाग समिती क्र. २ मध्ये सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स, प्रभाग समिती क्र. ३ मध्ये सन्मा. सदस्य नरेन्द्र मेहता आणि प्रभाग समिती क्र. ४ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ पटेल हया चार अध्यक्षांची काल निवडणुक झाली. ते अध्यक्ष म्हणून निवडुन आले. त्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रभाग समितीची निवडणुक नुकतीच पार पडली. त्या निवडणुकीत प्रभाग समिती क्र. १ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख, प्रभाग समिती क्र. २ मध्ये सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रिक्स, प्रभाग समिती क्र. ३ मध्ये सन्मा. सदस्य नरेन्द्र मेहता आणि प्रभाग समिती क्र. ४ मध्ये सन्मा. सदस्य आसिफ पटेल ह्या चार अध्यक्षांची काल निवडणुक झाली. ते अध्यक्ष म्हणून निवडुन आले त्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७ चे वाचन केले.)

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

प्रकरण क्र. ७ विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकाला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत (सार्वजनिक बांधकाम) यह जो सारे कार्य इस तरहसे दिये हुए है। यह सारे कार्य बरसातसे पूर्व विकास के लिए बहुत आवश्यक है।

(सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव झालेला आहे. अनुमोदन झालेले आहे. आता मी या ठिकाणी दुसरा ठराव मांडत आहे. खरे म्हणजे मी मा. महापौर मॅडमना विनंती करतो की कधी-कधी सभेच्या कामकाजाची चर्चा पहिल्यांदा करण्यात येते आणि नंतर ठराव मांडण्यात येतो. कधी-कधी सत्ताधा-यांची अशी अपेक्षा असते की आम्ही ठराव मांडला म्हणजे पुढची चर्चा नको. तेव्हा मा. महापौर मॅडमनी कुठेतरी हा असा निर्णय घेतला पाहिजे की कुठलाही ठराव मांडायचा असेल तर चर्चा करुन मांडायचा की चर्चेनंतर मांडायचा. जर ठराव करायची घाई करण्यात आली तर प्रत्येक वेळेला आमचेसुध्दा ठराव असतील. त्या ठरावाच्या अनुषंगाने दोन्ही बाजूने ओढाताण होईल आणि आपल्याला शेवटी त्यासाठी जास्त कौशल्य पणाला लावायला लागेल, दोघांचे एकमत करण्यासाठी. शेवटी हे प्रश्न विकास कामांचे आहेत. हा काही कोणाचा वैयक्तिक प्रश्न नाही. महापालिकेच्या प्रगतीच्याबाबत प्रश्न आहे. आता त्यांनी ठराव मांडलेला आहे. म्हणून आम्ही या ठिकाणी दुसरा ठराव मांडतो.

(सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे गेल्या वर्षामध्ये जी कामे चालू झालेली आहेत. ती कामे आता प्रगती स्तरावर आहेत. ती कामे पूर्ण झालेली नाहीत. ती कामे पूर्ण झाल्यानंतर त्याची देयकेसुध्दा आपल्याला दयावी लागणार आहेत. त्याच संदर्भात आम्ही ती मागणी केलेली होती की किती रक्कम आपल्याकडे बाकी आहे. रु. ५० लाखाची कामे घेतलेली आहेत की रु.१ कोटीची कामे घेतलेली आहेत. सदर विकास कामाची निविदा रक्कम आमच्या मते जवळजवळ रु. ५ कोटी रुपये आहे तसे असेल तर प्रशासनाने खुलासा करावा.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सन २००४-०५ मधील जी प्रलंबित कामे आहेत. ती एकूण रु. ५,८३,००,०००/- ची आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

हे बरोबर आहे. तुमच्याकडे किती पैसा उपलब्ध राहणार आहे. तुम्ही किती कामे आणता त्याला महत्व नाही. तुमच्याकडे किती पैसा उपलब्ध राहणार आहे. त्याच्यावर तुम्ही कामे करु शकणार आहात. आपल्या सर्वांचे मानधन देउनसुध्दा आपण ही कामे करु शकू असे मला वाटत नाही. म्हणून मागची बिले बाकी आहेत आणि चालू कामांची बिले बाकी आहेत याचा कधीही विचार केला गेला नाही. रु. ६,६६,८१,०००/- म्हणजे आमची जवळजवळ ७ कोटीची बिले गेल्या वर्षीच्या कामामध्ये जाणार आहेत. आम्हाला आता हया वर्षामध्ये ही कामे करायला किती पैसा उपलब्ध राहणार आहे. त्याला जास्त महत्व आहे. हे सगळे चुकविण्यासाठी तुम्हाला यंदाचे जे महसुली उत्पन्न अपेक्षित आहे. ते महसुली उत्पन्न आणि प्लस तुम्ही भांडवली खर्च करण्यासाठी काही कर्ज घेणार आहात. तुम्ही त्याच्यातून हे सगळे चुकविणार आहात. कुठल्याही सदस्याला मनपाने वार्षिक लेखे सादर केलेले नाहीत. जमा-खर्च काय आहे? जमा किती? खर्च किती? शिल्लक किती? कामावर किती खर्च झाला? ही महापालिका स्थापन झाल्यापासून दोन वर्षे झाली. आजपर्यंत एकाही सदस्याला ही माहिती दिली जात नाही. स्टँडिंग कमिटीचे चेअरमन श्री. मोहन पाटील हे महापालिकेची प्रायव्हेट प्रॉपर्टी समजतात काय तेच मला माहिती नाही. ते त्यांच्याकडेच ठेउन बसतात आणि गिरवत बसतात. हा सगळा लेखा त्यांनी सगळया सदस्यांना सादर करायला पाहिजे. ही जबाबदारी आयुक्तसाहेबांची नाही. आयुक्तसाहेबांनी जे कायदयामध्ये नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे हे सगळे लेखे त्यांच्याकडे वेळोवेळी पाठविलेले आहेत. आता त्यांनी त्याच्यावर काय अभ्यासच केला नसेल तर आणि त्यांचा दोन-तीन वर्षाचा हिशेब बाकी असेल तर आम्हाला सगळयांना आता हा हिशेब विचारायचा आहे की तुम्ही तीन वर्षात केवढी मोठी उलाढाल केली. या उलाढालीतून तुमच्या हातामध्ये नक्की काय राहिले? काय नाही. हे तुम्ही आम्हाला सांगा. कोणीही सदस्याने इथे उठून सांगावे की आमच्याकडे गेल्या वर्षीचे रु. ५० कोटी आहेत. हया वर्षीचे रु. २०० कोटी आहेत किंवा रु. २५० कोटी आहेत. म्हणजे मॅरेथॉन शर्यत करुन एकाच फटक्यात पुढे काहीही काम बाकी ठेवणार नाही. मला वाटते की स्टँडिंग मिटिंग होणार नाही. पुढे स्टँडिंगची निवडणुक होणार आहे. त्याला काही काम नसणार आहे. स्टँडिंगच्या सभापतींनी आपल्याकडे इतकी कामे एकाचा फटक्यात मंजुर करायला टाकलेली आहेत. हेही महत्वाचे आहे. म्हणजे आपण हयाच्याबद्दल त्यांना मानचिन्ह किंवा सुवर्ण पदक दयायला पाहिजे. कारण एकाच मिटिंगमध्ये रु. १७८ कोटीची कामे घेतलेली आहेत आणि बजेट काय आहे? तर बोंबला. अशी परिस्थिती हयाच्यामध्ये आहे. बांधकाम विकास कामे मंजुर करण्यासाठी कोणते नियम तयार केलेले आहेत की नाही. आम्हाला याचीसुध्दा काहीही माहिती नाही. महापालिकेने आर्थिक लेख्याच्या संदर्भात, कुठलीही आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी देण्याच्या संदर्भात, टेन्डर कॉल आउट करण्याच्या संदर्भात, वर्कऑर्डर देण्याच्या संदर्भात, एस्टिमेट तयार करण्याच्या संदर्भात कुठलेही कायदे आजपर्यंत महापालिकेने तयार केलेले नाहीत. मागच्या सभेमध्ये आम्ही बोललो की सेवा शर्ती नियम अशा प्रकारे तयार केले गेले नव्हते. म्हणून हा सगळा व्याप झाला. आता सन २००२ साली महापालिका स्थापन झाली. मग आतापर्यंत तुम्ही कुठे होतात? याचा अर्थ असा आहे की त्यांना नगरपालिकेप्रमाणे काम चालू करायचे होते. मा. उपमहापौरसाहेब, म्हणूनच नगरपालिकेच्या कामकाजानुसार अकाउन्ट कोड नगरपालिकेचा वापरला जातो. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियमानुसार आमचे सध्याचे काम चालू आहे. आम्ही सर्व महापालिकेची लोक आहोत. हा लेखा विभाग आणि बांधकाम तसेच पाणीपुरवठा हया सगळया विभागाचे काम अकाउन्ट कोडप्रमाणे चालू आहे. रु. १७८ कोटीच्या अंदाजपत्रकाला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी दयायची आहे. आमच्याकडे किती पैसा शिल्लक आहे? हयाचा हिशेब करा. टोटल तरतुद फक्त रु. ८.५० कोटीची आहे आणि मंजुरी रु. १२८ कोटीला आहे. त्याच्यानंतर तुम्ही म्हणाल की आम्ही कर्ज घेउन करु. तर तुम्ही कर्जासाठी काय केलेले आहे की नवीन रस्ते, नाले, तळी,

विहिरींसाठी तुम्ही रु. साडे-बावीस कोटीची तरतुद केलेली आहे. तुम्ही आता ही तरतुदसुध्दा लक्षात घ्या. कर्ज निधीतून डी.पी.रोडची बांधकामे करायला रु. ४५ कोटींची तरतुद केलेली आहे. गटार दुरुस्तीला रु. २ कोटींची तरतुद केलेली आहे. रु. ८४ कोटींच्यावर तुमची एकही तरतुद नाही. तुमची रु. ८४ कोटींची तरतुद अख्या बजेटमध्ये असताना पहिल्याच एका स्टँडिंगच्या सभेला जवळजवळ मागील सगळया गोष्टी सोडून रु. ८४,६७,५८,७४०/- ची कामे आणलेली आहेत. आर्थिक तरतुद हयाच्यापेक्षा कमी आहे. तुम्हाला अजून रु. ४५ कोटी कर्ज घ्यायचे आहे. परंतु, ते कर्ज मिळाले कुठे आहे? प्लस तुमचे गेल्या वर्षीचे रु. ७ कोटी दयायचे आहेत. म्हणजे तुमच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत नसताना तुम्ही इतकी कामे हातात कशी घेतात? तुम्हाला जर हे घ्यायचे अधिकार आहेत. तर तुम्ही ज्या अकाउन्ट कोडला ॲप्लिकेबल केलेले आहे. मला वाटते् की सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी स्वतःचा अकाउन्ट कोड नक्कीच तयार केलेला नसेल. कारण ते एवढे हुशार आहेत की ते स्वतःचा अकाउन्ट कोड लावणार नाहीत. ते त्यांच्या पालिकेचाच अकाउन्ट कोड लावतील. तुम्ही पालिकेचा कोड वाचा. जोपर्यंत तुमच्याकडे बजेटमध्ये आर्थिक तरतुद नसेल तर तुम्ही काहीही करु शकत नाही. कुठलीही प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी देउ शकत नाही. टेन्डर वगैरे काढण्याच्या गोष्टी वेगळया आहेत. पहिल्या फटक्यात बॅटिंग करुन मागच्या येणा-या लोकांना बॅटिंग करायला ठेवा. मागचे स्टँडिंगचे चेअरमन येणार नाही का? तुम्हीच चेअरमन राहणार आहात का? पुढच्या वर्षी स्टँडिंग चेअरमन येईल. त्याला काहीतरी कामे करायला ठेवा. तुम्ही ही जी सगळी कामे घेतलेली आहेत. त्याची वर्गवारी पुढे बघितली तर असे वाटते की आपल्याला हयाच्यामध्ये डिटेलमध्ये सांगतो की रु. १२८ कोटीमध्ये तीन गोष्टी वगळता. तीन गोष्टी म्हणजे सिरीयल क्र. २९, सिरियल क्र. ३० आणि सिरियल क्र. १३. सिरियल क्र. १३ ची जी तरतुद आहे. त्याच्यासाठी आमदारांचा फन्ड मिळणार आहे. आपल्याला त्याला विरोध करुन चालणार नाही. सिरियल क्र. २९ आणि सिरियल क्र. ३० ची कामे झालेली आहेत. त्याच्या वर्क ऑर्डर झाल्या किंवा एक्सलेशन झाले. काहीही झाले. कारणे काहीही असू दे. जी कामे ऑलरेडी पार पडलेली आहेत. आता आपल्याला त्या कामांना आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी घेण्याची काय गरज आहे. आपण पहिले लग्न करतो आणि नंतर साखरपुडा करतो का? आपण पहिला साखरपुडा करतो आणि नंतर लग्न करतो. हयांनी तर अगोदर बारसच करुन टाकले, नंतर साखरपुडा केला आणि नंतर लग्न केले. या सगळया स्टँडिंग कमिटीच्या अजब त-हा आहेत. स्टँडिंग कमिटीने नियम घेतले. तुम्हाला जर असे पाहिजे होते अशा विशेष तरतुदी वापरायच्या होत्या तर महापालिकेचे स्वतःचे नियम तयार करायचे होते. जेव्हा महापालिकेने नियम तयार केलेले नाही तर आर्थिक लेखे अकाउन्ट कोडप्रमाणेच चालतात. अकाउन्ट कोडप्रमाणे चालल्यानंतर जोपर्यंत पुरेशी आर्थिक तरतुद नसेल तोपर्यंत तुम्हाला कुठल्याही कामांना आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी घेता येत नाही. विशेष करुन काशीमिरा रोड आणि आर.ओ.बी. च्या बाबतीत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्याची गरज नाही. जर ते काम पूर्वी दिलेले आहे आणि ते काम जर १० टक्क्यांमध्ये बसत असेल तर आयुक्त साहेबांना ते पूर्ण अधिकार आहेत. त्यांच्या अधिकारात ते त्यांचे पुढचे पेमेन्ट करु शकतात. या ठिकाणी आता मंजुरीचा प्रश्न राहिलेला नाही. कारण काम झाले. काम झाल्यानंतर उद्‌घाटने झाली. उद्‌घाटन एक वर्षांनी रखडले. तेही उद्‌घाटन गुण्यागोविन्दाने झाले. आम्हाला आता अक्कल सुचली की त्याच्यावर रु. ११ कोटी एक्स्ट्रा खर्च झालेले आहेत किंवा होणार आहेत. त्याची आम्ही मंजुरी देणार म्हणजे आम्हाला अक्कल कधी सुचते तर ती अक्कल आम्हाला बारसे झाल्यानंतर सुचते. आम्ही विसरलो की आम्ही लगीन करायचे बाकी राहिलेलो होतो. अशी परिस्थिती झालेली आहे. ही अक्कल फार उशीरा सुचलेली आहे. हे नियमांच्या बाहेर आहे. असा प्रयत्न कोणीही करु नये. माझा कोणाशी काहीही वैयक्तिक वाद नाही. परंतु, आपण जर असा प्रयत्न केला तर आपण ऑडिटच्या भानगडीत जाणार हीसुध्दा मी तुम्हाला सुचना देतो. जे काही आयटम या ठिकाणी आणलेले आहेत. आपण त्याच्यामध्ये अनुक्रमांक ४ पहा. भाईंदर पूर्व उड्‌डाणपुल जंक्शन ते साईबाबा मंदिर कोणीही इथला सदस्य सांगेल की साईबाबा मंदिर ते उड्‌डाणपुलापर्यंतचा रस्ता दोन वर्षापूर्वी केलेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांना माहिती आहे की तो रस्ता सन २००१ ला झालेला आहे. आपण त्या रस्त्यावर आज रु. अडीच कोटी रुपये दुरुस्तीला खर्च करतो. १०० टक्के ही रक्कम नक्कीच जास्त आहे. मला वाटते पॅचवर्क केले तर त्या ठिकाणी काहीही गरज नाही. ईस्टच्या कुठल्याही सदस्याला वाटणार नाही की तो रस्ता पुन्हा डांबरीकरण करावा. तुम्ही उगाच पैसा घालवता का? त्याच्यानंतर एस.एन. कॉलेज ते खाडीपर्यंतचा जो नाला आहे. आपण या ठिकाणी त्या नाल्याच्या पुर्नबांधणीच्या एस्टिमेटचा खर्च रु. १.५५ कोटीचा दाखविलेला आहे. महाराष्ट्र मित्रमंडळ ते एस.एन. कॉलेजपर्यंत त्याच्यासाठी रु. ५० लाखाचे टेन्डर निघून ते ऑलरेडी मंजुर झालेले आहे. कामसुध्दा चालू आहे. एस.एन. कॉलेज ते महाराष्ट्र मित्रमंडळ रु. ५० लाख. त्याच्यानंतर एस.एन. कॉलेज ते खाडी रु .१.५० कोटी. त्याहीपेक्षा ही

मजेची बाब आहे की गोडदेव नाक्यापासून ते महाराष्ट्र मित्रमंडळपर्यंत फक्त रु. एक कोटीची मंजुरी आहे. मग गोडदेव नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळ अंतर जास्त आहे की महाराष्ट्र मित्रमंडळ ते एस.एन. कॉलेज अंतर जास्त आहे की मग एस.एन. कॉलेज ते खाडीपर्यत अंतर जास्त आहे. मा. उपमहापौरसाहेब, आपण स्वतः गेलेले आहात. आपल्यालासुध्दा हे माहिती आहे की तुम्ही रु. दीड कोटीची मंजुरी मागता. त्या ठिकाणी रु. दीड कोटीचा खर्च तरी आहे का? ही सगळी एस्टिमेट यापुढे यायला पाहिजे होती. ती एस्टिमेट न येता डायरेक्ट आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीला येतात. तेही तुमची बजेट प्रोव्हिजन असेल तर जरुर आणा. मग आम्ही नंतर एस्टीमेट चेक करु. परंतु, ही एस्टिमेट चुकीची आहेत. त्याच्यानंतर दि. ५ जूनमध्ये जी मिटिंग झाली. त्या मिटिंगमध्ये गोडदेव नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळ रु. ५० लाख मंजुर झालेले आहेत. गोडदेव नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळ अंतर सर्वात जास्त आहे. त्याला रु. ५० लाखाची मंजुरी. त्याच्यानंतर महाराष्ट्र मित्रमंडळ ते एस.एन. कॉलेज तेही रु. ५० लाखाच्या आत आहेत. एस.एन. कॉलेज ते खाडी हे अंतर काय दोन किलोमीटर आहे. ते अंतर अर्ध्यापेक्षा कमी आहे. ते दीड कोटी रुपये म्हणजे ही टेन्डरची एस्टिमेट म्हणजे आपण काय पुढे मार्बलचे गटार बनविणार आहात का? की, आपण चांदीचा पत्रा लावणार आहात की, मुलामा देणार आहात. तसे असेल तर काही हरकत नाही. आपणसुध्दा एक अभिनव प्रयोग करित आहोत. या सगळया गोष्टी सगळे संशय निर्माण करणा-या आहेत. त्याहीपेक्षा तुम्हाला असे वाटत असेल की तुमचे एस्टिमेट बरोबर आहे तर आपण कुठल्याही एस्टिमेटला मंजुरी देण्याच्या अगोदर आपण आर्थिक तरतुद बघायला पाहिजे होती. दुर्दैवाने अशी आर्थिक तरतुद पाहिलेली नाही. त्याच्यामुळे हे सगळे विषय मॅरेथॉन विषय म्हणून आणलेले आहेत. पुढे काही काम करायला बाकी ठेवलेले नाही. मा. महापौर मॅडम, तुम्ही या ठिकाणी कुठलेही बजेट पेश करित असताना महत्वाची बाब म्हणजे बजेटमध्ये तुम्ही कोणती विकास कामे घ्यायची असतात. त्याची लिस्टिंग करायची असते. ही लिस्टिंग करताना तुम्हाला जे नगरसेवकांचे प्रस्ताव आलेले असतात. कुठली-कुठली विकास कामे हाती घ्यायची त्याचे संपूर्ण डिटेल घेउन त्यानुसार अंदाजपत्रके तयार करायची असतात. तुम्ही जेव्हा बजेट सादर केले. बजेट सादर करताना सर्वात प्रथम अधिकार हा आयुक्त साहेबांचा होता की त्या अधिकारानुसार त्यांनी कामे सुचविली असतील. मिरा रोडला एवढी कामे घ्या, पूर्वेला एवढी कामे घ्या, पश्चिमेला एवढी कामे घ्या. परंतु, त्यांनी तसे केलेले नाही. त्यांनी सरळसरळ असे म्हटलेले आहे की, नवीन रस्त्याला म्हणजेच डी.पी. रस्त्याला रु. ४५ कोटी आणि इतर रस्त्यांना रु. साडे-सात कोटी तर त्यांनी ही सगळी मोघम तरतुद दिल्यानंतर जेव्हा आयुक्तांनी आपल्याला एवढे मोठे क्षेत्र कुठली पाहिजे ती कामे टाकायला दिले. स्टँडिंग कमिटीने त्याच्यावर कधीही रिव्हीजन केलेली नाही की चला आपल्याला आयुक्त साहेबांनी संधी दिलेली आहे. तर आपण त्याच्यामध्ये ही सगळी कामे घुसवुया. मा. उपमहापौर साहेब सेक्शन ९५ चा (ए) पहा. ॲन एस्टिमेट क्लासिफाईड इन ॲकॉर्डिंग विथ दी रुल वीच मस्ट बी ऑर शुड इन हीज ओपीनियन बी इन्कर्ड बाय द कमिशनर. कमिशनर साहेबांनी जर तशा पध्दतीने ती कामे सुचविली असतील तर त्याला एक लिमिटेशन होते. स्टँडिंगला पूर्ण पॉवर्स असताना स्टँडिंगनेसुध्दा अशी कामे स्पेसिफाय केलेली नाहीत की ही-ही कामे करण्यासाठी आम्ही हे बजेट सादर केलेले आहे. कारण कामाची लिस्ट बजेटबरोबर दयावी लागते. ती लिस्ट दिलेली नाही. आता जेव्हा स्टँडिंगने निर्णय घेतलेला नाही. तेव्हा आता हा महासभेचा निर्णय आहे की कुठली कामे विकास कामे म्हणून घ्यावीत. त्यामुळे आता स्टँडिंगने दिलेल्या लिस्टला काहीही अर्थ राहत नाही. कारण त्यांनी त्यांचा अधिकार बजावलेला नाही. आता विकास कामे कुठली घ्यायची. जेव्हा हा जनरल बॉडीचा प्रस्ताव आहे. आजच्या कामांमध्ये आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी दयायची आहे. ते विकास कामे ठरवूनच आलेले आहेत. परंतु, हा ठराव त्यांनी स्टँडिंगला केलेला नाही. पुन्हा मुर्खासारखी बाब म्हणजे जेव्हा जनरल बॉडी सुप्रिम असते. तेव्हा यांना प्राधान्य क्रमांक कशाला दयायचा? हे काय करतात. कोणाचे सेटिंग झाले की नं. १ चे काम पहिले काढतात. लगेच नं. ६० चे काम काढतात. प्राधान्य क्रमांकाचा हयांचा अधिकार कुठे आहे? एकदा जनरल बॉडीने डिसीजन घेतला तेव्हा आयुक्तांना जसे-जसे वाटेल की हे काम घ्यायला पाहिजे तर ते-ते आयुक्तांनी करायचे असते. मा. महापौरांनी त्याला मान्यता दयायची असते. मा. महापौरांनी मान्यता दिल्याशिवाय आयुक्त ते काम घेणार नाहीत. परंतु, हयांनी काय केले. गेल्या जनरल बॉडीमध्ये ठरावामध्ये दोन वाक्ये घुसवली. आमचे सगळे सदस्य अशा ठरावावर सहया करतात. परवाच्या दिवशी सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी अशी सही केली. सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठेकेदाराने नेमलेले इंजिनियर हे नेमलेल्या तारखेपासून परमनन्ट करावेत. हे अजब विश्व चाललेले आहे. अख्ख्या महाराष्ट्रातील ठेकेदार जमा करा. तुमचे परमनन्ट लोक घालवा. त्यांना आणा. तुम्ही हे असले ठराव स्टँडिंगला करता आणि त्याच्यावर सदस्यांच्या खोटया सहया घेतल्या. मग सदस्यांना सांगतात की तुम्ही सहया केल्या होत्या असा प्रकार जर स्टँडिंगला चालत असेल तर निश्चितपणे ही स्टँडिंग या

सभागृहाची दिशाभुल करित आहे. एकतर त्यांनी त्याच्यावर बजेट किती आहे हा अभ्यास केलेला नाही. कुठली कामे घ्यावीत हे माहिती नाही. फक्त खुश करण्यासाठी मा. उपमहापौर साहेबांना सांगतील की, तुमच्या साहेबांचे आम्ही एक काम घेतले. इतर लोकांना सांगतात की, आम्ही तुमचे काम घेतले. आपण कामाची वर्गवारी पाहिली तर आपल्याला कळते. मा. महापौर मॅडम आणि मा. उपमहापौर साहेब आपण संपूर्ण शहराचे प्रतिनिधित्व करता. त्याच्यामध्ये सत्ताधारी पक्ष म्हणून त्यांच्या कामांना प्राधान्य देण्याचा आपल्याला नक्कीच अधिकार आहे. परंतु, हासुध्दा नैतिक अधिकार इतर पक्षाच्या नगरसेवकांचा आहे की, त्यांची कामेसुध्दा घेतली गेली पाहिजे. आज तुम्ही मागच्या हया सगळया आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीमध्ये बघा. कामे कशी घेतली? त्याची विगतवारी मी तुम्हाला सांगतो. काशीमिऱ्याची कामे फक्त रु. १ कोटी २१ लाख, भाईंदर पूर्वेची कामे रु. २ कोटी ६८ लाख, भाईंदर पश्चिमेची कामे फक्त रु. १ कोटी २६ लाख, राई, मुर्धा, मोर्वा, उत्तन क्षेत्रामध्ये फक्त रु. १ कोटी ९५ लाख वर्षभर मिळणार आहेत. काही करु नका. त्याच्यानंतर रु. १ कोटी ९५ लाख राई, मुर्धा, मोर्वा, उत्तनच्या लोकांनी वापरायचे. काशिमिऱ्याच्या लोकांनी फक्त रु. १ कोटी २१ लाख वापरायचे. नंतर तुम्हाला आयुक्तसाहेबांकडून सांगण्यात येईल की आता बजेट संपलेले आहे. पूर्वेच्या लोकांना रु. २ कोटी ६८ लाख वाटून घ्या. याच्यापुढे तुम्हाला एकही पैसा मिळणार नाही. त्याच्यानंतर कॉमन म्हणजे सर्वसाधारण आपल्याला भाईंदर पूर्व, पश्चिमेसाठी जी कामे करायची आहेत. ती कॉमन स्वरुपाची कामे ही जवळजवळ रु. ६२ कोटी २४ लाखाची आहेत. त्याच्यानंतर दुर्बल घटकातील कामांना विशेष वेगळी तरतुद आहे. म्हणून रु. ७६ लाखाची कामे घेतलेली आहेत. ते बरोबर आहे. दुर्बल घटकांसाठी कामांच्या संदर्भातसुध्दा आमचा काही आक्षेप नाही. त्यांनी ती कामे बरोबर तरतुदीच्या हिशेबाने घेतलेली आहेत. डी.पी. रोडची कामे रु. २१ लाख, एम.एल.ए. साहेबांचा जो फन्ड आहे तो रु. १ कोटी ३१ लाखाचा आहे. त्यांनी त्याच्यापैकी ८० लाखाची डिसबर्समेन्ट केलेले आहे. आपण परत तांत्रिक चुक काय करता की कुठल्याही बजेटमध्ये जेव्हा ग्रॅन्ट कमी होतात किंवा वाढतात. कारण आपण बजेटमध्ये ग्रॅन्ट किती दाखविला आहे ते बघा. आपण फक्त रु. २५ लाखाची ग्रॅन्ट दाखविलेली आहे. म्हणजे तुम्ही बजेट ग्रॅन्ट कमी दाखविलेली आहे. बजेट ग्रॅन्ट वाढविण्यासाठी तुम्हाला सभेमध्ये विषय घ्यावा लागेल. कारण तुम्हाला माहिती आहे की रु. ८० लाख आले आणखी रु. २० लाख येणार असतील. मग त्याच्यासाठी तुम्हाला तो विषय घेतल्याशिवाय तुम्ही याला मंजुरी कशी देणार? कुठलीही आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देताना जोपर्यंत तुमच्या बजेटमध्ये तरतुद नाही. कारण तुम्ही अकाउन्ट कोड वापरतात. हयांनी महापालिकेचे स्वतःचे नियम केले असते तर ही परिस्थिती आली नसती. जेव्हा स्टँडिंगने असा ठराव केला की अकाउन्ट कोडप्रमाणे आम्ही चालायचे मग आता त्यांनी असा ठराव करणार का की अकाउन्ट कोडप्रमाणे चालायचे नाही असे करायचे असेल तर करा. परंतु, ते करण्यापूर्वी स्वतःच्या महापालिकेचे नियम तुम्हाला तयार करावे लागतील. ऑडिटरसाहेबांना एक विनंती करतो की खरे म्हणजे तुम्ही वार्षिक रिपोर्ट सादर करित असतात. मला माहिती नाही की तुम्ही करता की नाही. कारण ते बघण्याचा आमचा अधिकार नाही. तो अधिकार कार्पोरेशनपुढे येईल. परंतु, तुम्हीच तयार केला नसेल आणि हयांनी ज्या काही इरेग्युलरिटीज केलेल्या आहेत. हया जर तुम्ही लक्षात आणल्या नसतील तर ऑडिटरसाहेब तुम्ही जबाबदार आहात. आपण परवा असे तीन कर्मचारी खोटे कामावर घेतले. ठेकेदाराचे लोक कधी ठेकेदाराकडे काम केल्याच्या तारखेपासून महापालिकेत रुजू होतात का? ठेकेदाराच्या अंडर त्यांनी वर्ष-दोन वर्षे काम केले. तुम्ही आता लगेच महापालिकेच्या आस्थापनेवर ठेकेदाराच्या तारखेपासून घेणार का? बरे आहे. मग तुम्ही असे सांगितले नाही की आमची ग्रॅच्युटी लावा. आम्ही नगरपालिकेपासून काम करतो. आमचासुध्दा पंधरा वर्षापासूनचा अनुभव लावा. हे कुठल्या नियमामध्ये बसते. अशा प्रकारचे ठराव होत असतील आणि ऑडिटर आपण जर गप्प बसत असाल तर आम्ही स्पेशल ऑडिटची मागणी करु. हेसुध्दा तुम्हाला आजच्या सभेमध्ये सांगतो. इररेग्युलरिटीज आपण निदर्शनास आणल्या असतील तर आयुक्तसाहेबांनी निश्चितपणे त्या स्टँडिंगला दिल्या असतील. स्टँडिंगवाल्यांनी हे सगळे घोंगडे लपवून ठेवलेले आहे. लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या गोष्टी, इन्टरनल ऑडिटरने सादर केलेल्या गोष्टी, ऑडिटरसाहेबांनी सादर केलेल्या गोष्टी आपण लपवून ठेवता. खरे म्हणजे त्या गोष्टी नगरसेवकांना कार्पोरेशनच्या समोर आणल्या पाहिजेत. आपण वार्षिक लेखे लपवून ठेवलेले आहेत. वार्षिक लेखेसुध्दा हया नगरसेवकांना गेल्या तीन वर्षात एकही वार्षिक लेखा दिलेला नाही. आम्हाला त्याच्यामुळे कसे समजणार की ही नगरपालिका घाटयात चाललेली आहे की फायदयामध्ये चाललेली आहे. हुशाऱ्या मारायच्या की आम्ही रु. २०० कोटीची कामे करतो आणि तुमची तरतुद फक्त रु. ८० कोटीची आहे. म्हणजे अंगापेक्षा बोंगा मोठा बोलतात तशी हयांची परिस्थिती झालेली आहे. मा. आयुक्तसाहेब, मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौरसाहेब आपल्याला हया गोष्टीची कल्पना आहे. आपण नवीन नाही. मा. महापौर मॅडम जरी नवीन असल्या तरी

आपण नवीन नाही. आपण जर तरतुदीच्या हिशेबाने हया गोष्टी केल्या तर दुर्दैवाने हयाच्यावर आम्हाला काही मागणी करावी लागेल. मी ही जी दुर्बल घटकातील कामे सांगितली आणि बाकी वगळून आम्ही या गोष्टीला मंजुरी देत नाही. कारण आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीने ठराव मांडतो.

**सुधा गोयंका :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाप्रमाणे बोलतो की सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी ऑडिटबद्दल आणि विशेष करुन सारखा-सारखा स्टँडिंग कमिटीचा उल्लेख केला. परंतु, इथे बसलेल्या जनतेचे प्रतिनिधी, सर्व मान्यवर नगरसेवक यांना कल्पना आहे. कोणीही आपल्या छातीवर हात ठेवून सांगायचे की या शहराचा विकास झालेला आहे की नाही. या शहराचा विकास अतिशय गतीशीलपणे चाललेला आहे आणि व्यवस्थित नियोजन करुन आपण या शहरात योग्य वेळी योग्य कामे घेत असतो. बजेटमध्ये प्रोव्हिजन असल्यामुळेच आपण ही कामे प्रस्तावित केलेली आहेत. अहवालाचा प्रश्न येतो. लेखा परिक्षणाचा प्रश्न येतो तेव्हा आपल्याकडे त्रैमासिक लेखा परिक्षण प्रोव्हिजन आहे. त्याचे लेखा परिक्षण व्यवस्थित सुरु असते. त्याबद्दल सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब आपल्याला खूप नॉलेज आहे. आपण या शहराचे नगराध्यक्ष होतात. आपल्याला ही सगळी माहिती आहे. हयाच्यामध्ये कुठलेही काही चुकीचे चाललेले आहे अशातला प्रकार नाही. परंतु, ज्या-ज्या ठिकाणी गरज आहे. त्या गरजेप्रमाणे कामाचे नियोजन केलेले आहे. बजेटमध्ये तेवढी प्रोव्हिजन असल्यामुळेच आपण हे काम घेतलेले आहे. या विषयात ठरावदेखील पारित झालेला आहे. आपल्याकडून तसा ठराव आलेला आहे. परंतु, आपल्याकडून आमच्याकडे अजूनपर्यंत ठराव पोहोचलेला नाही. कुठल्या ठरावावर काय कार्यवाही करायची आहे याबाबत मा. महापौर मॅडम आपल्याला निश्चित सांगतील.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता जो विषय चाललेला आहे. सर्व नगरसेवकांना वाटते की आमच्या वॉर्डामध्ये काम व्हायला पाहिजे. आपण जी कामे सुचविलेली आहेत. बजेट किती आहे? तरतुद किती आहे? तुम्ही ती कामे करायला दिली. टेन्डर काढले. ते चेक होणार की चेक होणार नाही. ते सर्व नगरसेवकांचे लुक-आउट नाही. ते सगळे लुक-आउट प्रशासनाचे आहे. आम्ही काम सुचविले. आपण ते घेतले आणि आमच्या वॉर्डातील तीन-चार कामे सुचविलेली होती. ती आपण घेतलेली नाही. त्याच्यामध्ये जो मुख्य मुद्दा सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी उचललेला आहे. त्याच्यामध्ये रु. अडीच कोटी रस्त्याचा मुद्दा आहे. म्हणजे आपण जे मेन टेन्डरचे एस्टिमेट दिलेले आहे. आपण ते एस्टिमेट डायरेक्ट आमच्याकडे पास करायला दिलेले आहे. आपण त्या एस्टिमेटवर चर्चा करायला दिलेली नाही. कारण तिकडे रु. अडीच कोटीचा रस्ता होउ शकत नाही. जे रु. ५० लाखाचे रस्ते दाखविलेले आहेत. तेही रस्ते होउ शकत नाहीत असा प्रश्न उद्भवलेला आहे की कुठल्याही कामाचा विरोध कुठल्याही नगरसेवकाला नसतो. या शहराचा विकास झालेला नाही असे कुठलाही नगरसेवक सांगत नाही किंवा सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनीसुध्दा असे सांगितलेले नाही. माजी नगराध्यक्ष गिल्बर्ट मेन्डोसा यांच्या काळातसुध्दा विकास झालेला आहे. आपल्या काळातसुध्दा विकास झालेला आहे. रु. अडीच कोटी आणि रु. ५० लाखाची जी शंका निर्माण झालेली आहे. फक्त एवढाच मुद्दा उद्भवलेला आहे. ती शंका योग्य आहे. त्यांच्या ठरावाला माझेसुध्दा अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, दोन वर्षापूर्वी म्हणजे दोन बजेटमध्ये प्रत्येक प्रभागात काही रक्कम रिपेरिंग वर्कस म्हणून देण्यात आली. आपले काही नगरसेवक वॉर्डचे रिपेरिंग न करता काही गटार निर्माण केले. आम्ही आमच्या वॉर्डचे सांगतो. आम्ही कुठलेही रिपेरिंग न करता चांगल्या पध्दतीने नियोजनबध्द गटार केले. आता आपण हे जे प्रशासकीय मंजुरीमध्ये दिलेले आहे. नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये रिपेरिंग फन्ड म्हणून तुम्ही एक रुपयासुध्दा दिलेला नाही. तुम्हाला उदाहरण सांगतो. आज तुम्ही भाईंदरमधून छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर गेलात. तर तिथे आपले जे मेन फुटपाथ आहे. त्याच्यामध्ये अनेक ढक्कण गायब झालेली आहेत. लोक आम्हाला सांगतात. तुम्ही रामभाउकडे जा. रामभाउंकडे तीन झाकणी नाहीत. म्हणजे अनेक ठिकाणी झाकणी नाहीत. तुम्ही जे फुटपाथ येण्या-जाण्यासाठी बनविलेले आहे किंवा उभे राहण्यासाठी बनविलेले आहे. त्याच्या लादया फुटलेल्या आहेत. आपण त्याला कुठलीही रक्कम दिलेली नाही. म्हणजे आपण फार मोठे करायला गेलो. परंतु, छोटया लोकांना ते लक्षात येत आहे. आपण ते करित नाही. म्हणून आपण ही जी तरतुद केलेली आहे. तुम्ही त्याच्यामध्ये प्रभागवाईस रक्कम दिली पाहिजे होती. त्याच्यामध्ये छोटे-मोठे रिपेरिंग वर्क्स केले पाहिजे. आता आम्ही स्वतः इंजिनियरकडे गेलो आणि झाकण बदली करायची आहे असे सांगितले तर तरतुद

नाही असे साहेब सांगतील. म्हणजे हया छोटया-छोटया गोष्टी आहेत. आपण त्या विसरता कामा नये. याचाही आपण विचार करावा. लोकांनी उड्डाणपुल बघितला म्हणजे भाईंदरचा विकास झालेला आहे असे लोक समजतात. परंतु, एकाही गटारावर झाकण नाही. तेव्हा तेसुध्दा बोलतात की या गटारावर झाकण नाही ते तुम्हाला दिसत नाही का? महापालिका काय करते म्हणून विकास झाला नाही असे कोणीही बोलत नाही. छोटया गोष्टींवर तुमचे लक्ष असले पाहिजे याचीही तुम्ही या बजेटमध्ये, या प्रस्तावामध्ये तरतुद करुन घ्यावी अशी विनंती आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, हमारे प्रभाग नं. ८ मे छोटी-छोटी बहुतसी विकास कामे बाकी है। जिसके लिए मै पिछले तीन सालसे पत्रव्यवहार करता हूँ। लेकिन अभी तक काम नही हुआ है। मुझे कही बार आश्वासन दिया गया। अभीभी आश्वासन दिया है। मै उम्मीद करुंगा की मेरा काम पुरा हो जाए। कस्तुरी पार्क गटर का स्लॅप, चंदनपार्क, आर.एम.पी. पार्क मे गटर का स्लॅप, साईबाबा नगर के गटर का स्लॅप। ऐसे मेरे छोटे-छोटे काम है। जो मै आयुक्त साहब, महापौर मॅडम और उपमहापौर साहब को यह रिक्वेस्ट करता हूॅ की मेरा यह काम बारिश के पहले पुरा करके दिया जाए। ताकी मेरे प्रभागमे रहनेवाले लोगोंको असुविधा न हो और दुसरी बात ऐसी है की बीजेपी के नगरसेवकोंने गटर के उपर के ढक्कन के बारेमें कहाँ है। वह एक बहुत बडा विषय है। सभी गटर के ढक्कन चोरी होते है। आज गटर के ढक्कन लगाईये। दो दिन बादमे फिरसे वह ढक्कन चोरी होते है। तो उसका सिस्टिम चेन्ज किजिए या फिर उसका मटेरियल चेन्ज किजिए। सिमेंट का बनाईये और लगाईये या फिर उसको लॉक सिस्टिम किजिए। क्योंकी वह चोरी न हो। क्योंकी उधर हम लोगोंका ऑफिस है। हमारे पास उस ढक्कन के बारे मे ढेर सारे कम्प्लेन्ट आते है। यह हमारी आपसे रिक्वेस्ट है।

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, दोन ठराव आल्यामुळे दोन्ही ठराव मतदानाला घेण्यात यावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की प्रभाग क्र. १४ आणि प्रभाग क्र. १५ मध्ये नेहमीच पावसाळयात पाणी भरते. आपण विजय पार्कमध्ये गेले दहा महिने गटार खोदून ठेवलेले आहे. परंतु, गटाराचे काम केलेले नाही. त्यामुळे तिथे त्या गटारामध्ये गेले आठ दिवसापूर्वीच एक मनुष्य पडला होता. ते गटार इतके खोल आहे की तो माणूस सहा फुट आतमध्ये गेला. त्याचा मोबाईल हरवला. अक्षरशः त्याचे फक्त हात दिसत होते. म्हणून दुकानदाराने त्याला खेचून काढले. आपण गेले दहा महिने ते गटार खोदून ठेवलेले आहे. त्याच्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. तेथील गटार ताबडतोब व्हावे. खरे म्हणजे पावसाळया अगोदर मिरा रोडमधील गटाराची जी विकास कामे आहेत. ती व्हायला पाहिजे होती. आपल्याकडून त्याच्यासाठी फारच उशीर झालेला आहे. आपण ही कामे ताबडतोब करायला हवीत अशी माझी विनंती आहे. गेल्या पावसाळयामध्ये सहाही नगरसेवकांना, कमिशनरसाहेबांना, आम्हाला पावसामध्ये उभे राहून तिथल्या गटाराची परिस्थिती पाहून जिथे खोदण्याची आवश्यकता वाटली. तिथे खोदावे लागले. आम्हाला ते पाणी बाहेर काढावे लागले अशी वेळ येणाऱ्या पावसाळयामध्ये होउ नये यासाठी मी आपल्याला विनंती करित आहे. आपण ताबडतोब हयाच्यावर कार्यवाही करावी.

**हंसुकुमार पांडे :-**

आयुक्तसाहब, आपसे रिक्वेस्ट है । हमारे प्रभाग नं. ८ मे निर्मल पार्क और रामदेव पार्क ऐसे कॉम्प्लेक्स है । जिसमे बिल्डरने बहुत सारे काम बाकी रखे है । बीचमेसे कोई गटर नही बनाया। उसमे हर बारिश मे घुटनो तक पानी भरता है । हम लोगोंने लास्ट बारिश मे वहाँ व्हिजीट किया । लेकिन अगर यह काम बिल्डर के तरफसे होना चाहिए । तो मेरी आपसे विनंती है की आनेवाले काल मे इन बिल्डरोंको जैसे मनोज पुरोहित और शांतीलाल पंडयाजी इन दोनोंके यह कॉम्प्लेक्स है । इन दोनो को कोईभी आगे आनेवाली बिल्डिंग के लिए परवानगी न दी जाए । जब तक यह कॉम्प्लेक्स का काम पुरा नही करते है । तब तक परमिशन नही देनी चाहिए । हर समय अधुरा काम छोडकर लोगोंसे पैसे लेकर चले जाने की इनको आदत पड गयी है । वहाँपर रहनेवाले लोगोंको सिर्फ आश्वासन मिलता है की हम तुम्हारा काम करके देंगे । लेकिन काम होता नही है । यह मेरी रिक्वेस्ट है ।

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, जांगीडमध्येसुध्दा कमिशनर साहेब आणि आम्ही सर्व्हे केला होता. सर्व्हे करुन झाला. परंतु, अजून त्याच्यावर कार्यवाही झालेली नाही. कारण पावसाळयातसुध्दा त्याचा मला फार त्रास होतो. मी तिथे बाजूलाच म्हणजेच सिल्व्हर पार्कला राहत असल्यामुळे तिथे पाणी भरले की

रात्री-दिवसा कधीही, ॲनी टाईम तेथील रहिवाशी येतात. मग मला त्यांच्याबरोबर तिथे जावे लागते. आपल्या कर्मचाऱ्यांनासुध्दा ऐनवेळेस रात्रीचेसुध्दा बोलवावे लागते. तरी आपण ताबडतोब तिथे कार्यवाही करावी आणि लवकरात लवकर तेथील कामे पूर्ण करावीत.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरसाहेब, आपण या ठिकाणी मतदानाची मागणी केलेली आहे. कृपया सचिवसाहेबांनी मतदानाची प्रक्रिया सुरु करावी.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांना विनंती करण्यात येते की आपण आपले बोलणे थोडक्यात आटोपून घ्यावे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, यह जो क्र.२९ का काम उड्डाणपुल का यहाँपर आया है । रु. २७ करोड ४८ लाख का काम है । अपना जो १५० फुटका रोड था । उसकी जगह दस-दस फुट कम बनाया है। १३० फुटही बनाया है । उसके अंदरभी आपने रु. ३८ करोड ७७ लाख का वापीस फेरबदल किया है। आपने इतना बडा काम बिना मंजुरीसे पहले कैसे करने दिया? १० टक्का बिना मंजुरीसे कर सकते है। सब काम हुआ और अभी आपने रु. ३८ करोड ७७ लाख का काम प्रशासकीय मंजुरी के लिए लाया यह गलत है । रु. २८ करोडच्या मंजुरीला १५० फुट रस्ता झालेलाच नाही. १५० फुटाची रु. २८ करोडची मंजुरी होती. आपण १०-१० फुट कमी केले. पाईपलाईन किंवा वायरसाठी कमी केलेले आहेत. तरी रु. २८ करोडपासून रु. ३८ करोड झालेले आहेत.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सदर छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा जो रस्ता आहे. आपण १५० फुटचा कट टु कट म्हणजे एक टु दिडशे फुट असा रस्ता पाहिजे. परंतु, माप घेताना जिथे मोकळी मोठी जागा दिसली तिथे १५० फुटाची जागा मिळाली अशी दोन-तीन ठिकाणी जागा मिळाली. हा पूर्ण रस्ता १५० फुटाचा नाही. हा पहिला मुद्दा झाला. आपण त्याच्यासाठी त्यांना आता रु. ११ कोटी वाढवून देत आहोत. कोटेशन रु. २७ कोटीचे आहे. आपण आता त्याच्यासाठी रु. ३८ कोटी ७७ लाख दिलेले आहेत. जर तुम्हाला १० टक्क्यापेक्षा वाढवून दयायचे नाही तर हे ५० टक्के बसेल. ५० टक्क्याच्या आसपास येते. तुम्ही त्याला आमच्याकडे कुठल्या हिशेबाने परवानगी मागता. रस्ता पूर्ण झालेला आहे. रस्ता पूर्ण कट टु कट १५० फुटाचा आहे का? त्याच्या बाजूला जे गटार आहे. ते त्याच्या स्पेसमध्ये बसते का? बाजूला सर्व्हिस रोड व्हायला पाहिजे. तो झालेला आहे का? काय-काय झालेले नाही. पूर्ण रस्त्याची पुन्हा एकदा उच्चस्तरिय मोजणी करावी. आम्हाला १५० फुटाचा रस्ता हवा आहे. १५० फुटाच्या हिशेबानेच तुम्ही त्यांना पेमेन्ट करायचे. कुठेही एक इंच किंवा पाच फुट कमी मिळाले तर त्याचे संपूर्ण दायित्व आपल्याकडे राहिल. मा. आयुक्तसाहेब, आपण आज पीठासीन हयाच्यावर आहात. म्हणून आम्ही आपल्याला असे सांगतो की याबाबत हे जे रु. ११ कोटीचे तसेच आर.ओ.बी.चे रु. २१ कोटी हयाला आमची मंजुरी नाही. शिवसेना हयाला मंजुरी देत नाही.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

शिवसेनाने कभीभी किसीको मंजुरी नही दी है और १५० फीट रास्ता सिर्फ पेट्रोलपंप के पास नही है । बाकी सभी जगह पर है ।

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाणसाहेब एखादा सदस्य बोलत असेल तर तुम्ही बोलायचे नाही. प्रत्येक सदस्याला बोलायला चान्स दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

पीठासीन अधिकारी आहेत. ते परवानगी देतील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ७ मध्ये पहिली गोष्ट म्हणजे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी जो ठराव दिलेला आहे. त्याच्यामधील त्यांनी ज्या काही बाबी सांगितल्या त्या न्यायप्रविष्ठ बाबी आहेत. आपल्या प्रशासनातर्फे त्यांनी जे काही सांगितले जे लेखा परिक्षण केले जाते. माझे स्वतःचे पत्र आहे. मी तशी लेखी मागणी केलेली आहे. मी गेल्या वर्ष-दोन वर्षापासून मागणी करित आहे. परंतु, त्याच्यामध्ये अजूनही आयुक्त म्हणा किंवा महापौर कार्यालय म्हणा किंवा स्थायी समिती म्हणा. कारण माझ्या तीन प्रती असतात. मी प्रत्येकाला कॉपी देत असतो. अजूनपर्यंत याचे लेखा परिक्षणाबाबत महापालिकेचे किंवा कोणाचेही पत्र आलेले नाही की वार्षिक लेखा परिक्षण संदर्भात महापालिकेची काय परिस्थिती आहे. माझ्याकडे पत्र आहे. मी तुम्हाला मागणी केलेली आहे. सन्मा.

सदस्य प्रफुल्ल पाटीलांनी आता त्यांच्या ठरावावर सांगितलेले आहे. हे आम्ही गेल्या दोन वर्षापासून आपल्याकडे लेखी मागणी करित आहोत.

**मा. आयुक्त :-**

ते झाले आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला कोणीही दिलेले नाही. आम्हाला कॉपी मिळालेली नाही. आम्ही कॉपी मागितलेली आहे. माझ्याकडे आता इथे सेन्ट्रल ऑडिटने दि. २९/११/२००४ आणि दि. ८/१२/२००४ एक मुख्य लेखा परिक्षक साहेबांना पत्र दिलेले आहे. त्याच्यामध्ये सन २००२-०३ आणि सन २००३-०४ च्या ऑडिटमध्ये काही क्युरिज काढलेल्या आहेत. आपण त्याच्यामध्ये विषय क्र. ३० घेतलेला आहे. मॅडम, आपण मुळ अंदाजपत्रक १६(५२) चे रु. ५१,५००/- आणि सुधारित अंर्तगत रु. २१,०७,००,०००/- जी अमाउन्ट दाखविलेली आहे. त्याच्यामध्ये माझ्याकडे हा जो रिपोर्ट आहे ती कॉपी ऑडिटर साहेबांकडे अॅव्हेलेबल आहे. ती कॉपी मी दयायची गरज नाही. हयामध्ये बांधकाम करणारे त्यावेळेचे जे ठेकेदार आहे. त्यांचे नाव केतन कन्स्ट्रक्शन कंपनी आहे. हयांनी ॲस पर दी स्टँडिंग कमिटी रेझ्युलेशन नं. ४१४ डेटेड ३१/१०/२००१ सेकन्ड फ्लोअर टेन्डर इन ओरिजनल टेन्डर डिड ऑफ १९९८ मेसर्स गॅमन इंडिया लिमिटेड वॉज कॉल फॉर द डिस्कशन ॲन्ड आफटर नंबर ऑफ मिटिंग डिस्कशन मेसर्स गॅमन इंडिया लिमिटेड ॲग्री टु एग्झिक्युट दी बॅलन्स वर्क ॲट ओरिजनल आउट स्टँडिंग रेट एस्टिमेटेड. ही जरा माझ्याकडे ही फेन्ट कॉपी आहे. एस्टिमेटेड रेट ३९.८५ अबाउ कोटेड बाय द इन म्हणजे हे जे पान आहे. हयाच्यामध्ये ती कंपनी त्यावेळेला त्या रेटमध्ये काम करायला तयार होती असे हयाच्यावरुन दिसते. असे असताना आपण हयाच्यामध्ये आणखी रु. २१ कोटीची तरतुद करित आहोत. ती कंपनी तयार असतानासुध्दा आपण हयाच्यामध्ये वाढीव रक्कम कुठल्या आधारे देतो. त्याचा जरा खुलासा प्रशासनाने करावा. या संपूर्ण डॉक्युमेन्टमध्ये त्यांनी ऑब्जेक्शन काढलेले आहे. म्हणजे एकतर आम्हाला हयाच्या कुठल्याही एस्टिमेट दिलेल्या नाही. त्याच्यानंतर मेजरमेन्टस नाहीत. माझा मुद्दा क्र. सेन्ट्रल ऑडिटने जे ऑब्जेक्शन काढलेले आहे. ते आम्हाला हयाच्यामध्ये कुठले आहे ते माहिती नाही. या सिरियलमधील सिरिसल क्र. १३ हयामध्ये मिरा रोड आरक्षण क्र. १९२, आरक्षण क्र. १९३ मध्ये नागरिकांना वातानुकुलित शवागृह, रक्तपेढी, दवाखाना व वाचनालय इत्यादीकरिता आमदार निधीतून इमारत बांधणे हे विषय आहेत. त्याच्यामध्ये रु. १,३१,४७,६७५/- म्हणजे माझ्या माहितीनुसार पहिली गोष्ट म्हणजे जे काम करायला माझा कुठलाही विरोध नाही. त्या तिकडच्या नागरिकांना ती सुविधा व्हावी असे मला मनोमन वाटते. म्हणजे कोणीही त्याचा विपर्यास करु नये किंवा इकडच्या नगरसेवकांनी त्याचा गैरसमज करुन घेउ नये. परंतु, सर्व्हे नं. ३०, सर्व्हे नं. ३१, सर्व्हे नं. ३२ हे टोटल आरक्षण नंबर आणि डी.पी.मध्ये नं. १९२ आहे. आपल्याकडे या खाजगी जागेचे हस्तांतरण झालेले नाही. महापालिकेने सदर विषय या महासभेपुढे आणलेला आहे. सदर सेम विषय आमच्या भाईंदर पश्चिमेला जे जिल्हा परिषदेचे इस्पितळ आहे. त्याच्या शेजारी शवागृह बनण्याकरिता मी आयुक्तांकडे लेखी पत्रव्यवहार केलेला होता. त्याच्यामध्ये मा. आयुक्तांनी अशी एक अट टाकलेली आहे की जमीनीचा मालकी हक्क आपल्याकडे असेल तर त्या एका शब्दामुळे आम्ही गेल्या पाच महिन्यापासून फे-या मारतो. परंतु, परवानगी मिळालेली नाही असे एकीकडे एक न्याय म्हणजे टेम्बा हॉस्पिटलला शवागृह बनवायचे असेल तर मालकी हक्काची परवानगी असल्याशिवाय तुम्हाला ते बनविता येणार नाही असे आयुक्त बोलतात. विषय क्र. १३ मध्ये भले आमदार निधीने म्हणजे उदया एखादा कोणताही आमदार असेल किंवा खासदार असेल त्यांनी निधी दिला. परंतु, ती जागा अजून मिळालेली नाही. जागेचे प्रोसेस पूर्ण केल्यानंतर म्हणजे मला आयुक्तांचेच एक पत्र आहे की आमच्याकडे जागा आलेली नाही. त्यामुळे आम्ही खर्च करु शकत नाही. माझ्याकडे हे आयुक्तांचे पत्र आहे. मला पाच महिने त्याच्यात त्रास झालेला आहे. माझा स्वतःचा काहीही स्वार्थ नाही. भाईंदर पश्चिमेच्या किंवा मिरा भाईंदरच्या जिल्हा परिषदेच्या आरोग्य केन्द्राकडे शवागृह बनावे अशी आमची मनोमन इच्छा आहे. पब्लिकचीसुध्दा मागणी आहे. परंतु, एकीकडे आयुक्त म्हणतात की जमीन ताब्यात असल्याशिवाय काहीही होणार नाही. इकडे आमदारांनी जरी निधी दिला. आम्हाला मान्य आहे. आमचा काहीही आक्षेप नाही. त्यांनी आणखी निधी दयावा. चांगली गोष्ट आहे. परंतु, मग आपल्याकडे नियमानुसार जागा ताब्यात नसताना हा विषय कसा काय आला?

**मा. आयुक्त :-**

जागा ताब्यात आहे.

**भोपळे :-**

डी.आर. चे सर्टिफिकेट इश्यु केलेले आहे. दि. २२/०७/२००२ अन्वये डी.आर. सर्टिफिकेट श्री. आशुतोष यांना दिलेले असल्याने त्याच दिवशी जागा मनपाच्या ताब्यात दिलेली आहे. जागा ताब्यात आलेली आहे. सात-बाराच्या उताऱ्यावरदेखील महापालिकेचे नाव लावलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हयाची नोंद करायला पाहिजे. आम्हाला कसे कळणार एकाही विषयपत्रिकेचे डिटेल व्यवस्थित दिलेले नाही. काहीही दिलेले नाही. हा जो शेवटचा विषय आहे. म्हणजे हे वाद कसे होतात ते बघा. तुम्ही एकीकडे आम्हाला एवढया करोड रुपयाचे विषय आणले. हयाच्यामध्ये दोन लाईन टाकल्या असत्या की सदर जागा महापालिकेकडे हस्तांतरित केलेली आहे. विषय संपला. परंतु, आपण टाकलेले नाही. हयाच्यामध्ये जो शेवटचा एक विषय क्र. ६० आहे. फाउन्टन हॉटेल जंक्शन ते ठाणे जकातनाका येथील रस्त्याच्या दुभाजकात स्ट्रिट लाईट आणि पोल लावणे. साहेब, आपण घोडबंदर ते फाउन्टन हॉटेलपर्यंतच्या रस्त्याला केले. कारण तो नॅशनल हायवे क्र. ८ आहे. आम्ही त्याच्यामध्ये स्टँडिंगला असताना सर्व्हे करताना मी स्वतः होतो. त्याच्यामध्ये रस्त्यावर लाईट लावण्याकरिता माझे पत्रसुध्दा आहे. परंतु, फाउन्टन हॉटेल ते ठाण्याकरिता जाणारा रस्ता हा एम.एस.आर.डी. ने टोलमध्ये दिलेला आहे. टोलवाल्यांना जे सगळे काही मेन्टेनन्स करायचे असेल ती त्यांची जबाबदारी आहे. हयाच्यामध्ये आपले काही नाही. कारण महापालिकेला टोलवाल्यांकडून काही मिळते का? स्टेट गव्हर्नमेन्ट घेते. स्टेट गव्हर्नमेन्ट तुम्हाला हयाच्यामध्ये काही रिलॅक्सेशन देते का? स्टेट गर्व्हनमेन्ट रिलॅक्सेशन देत नाही. आता तुमची ही जी रु. ७८ लाखाची रक्कम आहे. ती अमाउन्ट जर उदया त्याच्यामध्ये अडकली तर तुम्हाला ती सुट किंवा काहीतरी अनुदान वगैरे मिळणार आहे का? एम.एस.आर.डी. जे आहे. त्यांच्याकडून तुम्हाला त्याच्या बदल्यात काही मिळणार आहे का? म्हणजे ही काय रिफन्डेबल अमाउन्ट आहे का? नाही. आता त्याचा टोल जर तिसरी व्यक्ती प्रायव्हेट घेत असेल तर तेवढयापुरता जी लाईट आहे. ती तुम्ही त्यांना कळवावे की इथे अंधार आहे, इथे अपघात होतात. तिथे तुम्ही हयांच्या माध्यमातून लाईट लावून घ्या. आपल्या महापालिकेचे त्याच्यामध्ये रु. ७८ लाख कशाला टाकायचे? आम्ही एकीकडे फाउन्टन हॉटेलपर्यंत परवानगी दिलेली आहे. कारण त्या चढणीवर आतापर्यंत भरपुर मोठे-मोठे अपघात झालेले आहेत. तुम्ही हयाच्यावर पूर्णपणे विचार करा. मी परत एकदा सांगतो. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव वाचला. त्याच्यामध्ये त्यांनी ज्या काही सुचना केलेल्या आहेत. परंतु, हया ठरावामध्ये जे लिहून दिलेले आहे. त्याच्याशी आम्ही जनता दल सेक्युलरचे तिन्ही नगरसेवक सहमत आहोत. विकसनशील कामाला आमचा काहीही विरोध नाही. परंतु, बजेटच्या तरतुदीनुसार त्याच्यामध्ये जे दिलेले आहे. जे पैसे बजेटमध्ये बाकी आहेत. आपल्या हातामध्ये जी अमाउन्ट आहे. तेवढयापुरती त्या खर्चाला आमची मंजुरी असेल. उर्वरित जे काही असेल त्याच्यामध्ये आम्ही आणि पूर्ण जबाबदारीने सांगतो असे नाही की कामे झाली पाहिजेत आणि विरोधही करायचा आहे. तसे नाही. आपण हया विषयाची सूंपर्ण स्क्रुटीनी करा. हयाच्यामध्ये काही महत्वाचे विषय आलेले नाहीत. आम्ही ट्री ॲथोरिटीकडून काही प्रपोजल पाठविली होती. ती प्रपोजल लोकांना फार उपयोगाची आहेत. शहरामध्ये गटारे किंवा रस्ते बनविले म्हणजे विकास होत नाही. आयुक्तसाहेब, आपल्या माहितीकरिता सांगतो की आपण स्वतः घरी जातात. तेव्हा एस.के.स्टोनसमोरच एक रस्ता बनविलेला आहे. मा. उपमहापौरसाहेब, आपणसुध्दा जरा जाउन बघा. तो रस्ता पूर्णपणे डांबरीकरणाचा रस्ता आहे. आपल्या मेन रोडची हाईट किती आहे? त्या रोडची हाईट किती आहे? ते जरा बघा. येत्या पावसाळयामध्ये त्या रस्त्यावर तीन फुट जास्त पाणी जमेल. कारण तो संपूर्ण रस्ता शेतीच्या लेव्हलला आपण तो डांबरी रोड करित आहोत. आता त्या ठिकाणी दगड आणि माचण लावायचे काम चालू आहे. त्याची जी लेव्हल आहे आणि आपल्या पाण्याची काय लेव्हल आहे. ती जरा तिकडे काढून बघा. माझ्या माहितीनुसार आपण तो रस्ता तीन फुट डांबरीकरणाचा करित आहोत. तो रस्ता उंच झाला पाहिजे. तुमच्याच प्रभागामध्ये, तुमच्याच विभागामध्ये आहे. परंतु, रस्त्यावर उभे राहिले की लगेच कळते की आपण मेन रोडवर किती उंच आहोत. एकीकडे एस.के.स्टोनपासून नयानगरला जाणारा रोड केवढा उंच आहे. ज्याच्यासमोर आता जो नवीन रोड बनत आहे. तो रोड सात-आठ फुट खाली आहे. हे जरा तुमच्या शहर अभियंत्यांना कुठल्या नियमात बसते ते बघून घ्यायला सांगा. आपल्या मंजुरीचा प्रश्न नाही. आम्ही मंजुरी देतो. परंतु, तिकडे काम कसे होते? काय होते? काय नाही. आता बरेच नगरसेवक उभे होते. आपल्या शहराचा विकास होत आहे आणि जो विकास होतो तो आपण समोर बघतो. म्हणून आपले नगरसेवक काही ना काहीतरी बोलत असतात. माझे एक स्पष्ट मत असे आहे की आम्ही हयाच्यामध्ये जी काही बाकी सुचविलेली कामे होती. ती कामे पावसाच्या अगोदर झाली पाहिजे होती. ती अजून झालेली नाहीत. त्याच्यावर दृष्टिक्षेप टाकावा. आम्ही काही लेखी सुचना केलेल्या

आहेत. हयाच्यातील काही कामे कमी होणार असतील तर ती कामे ॲड करुन हया लिस्टमध्ये ती कामे ॲड करावीत अशी माझी सुचना आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला माझे पूर्णपणे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरीचा विषय आहे. सभागृहामध्ये विषय आल्यानंतर सर्व सन्मा. सदस्य आर्थिक आणि प्रशासकीय विषयाला मंजुरी देतात. परंतु, मंजुरी दिल्यानंतर त्यांची कामे होतात का? आम्ही मंजुरी देतो. परंतु, पुढे काय? पुढे काही होत नाही. दि. ०५/०६/२००४ रोजी एक विषय प्रशासकीय मंजुरीसाठी आलेला होता. भाईंदर (पूर्व) जैसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडी लगतचा रस्ता डी. पी. रोड तयार करण्याकरिता माती भराव व संरक्षक भिंत बांधणे. साडे-सतरा करोड! या रस्त्याचे काय झाले? मला कोणीतरी उत्तर देईल का? प्रशासकीय मंजुरी दि. ०५/०६/२००४ रोजी दिलेली आहे. आपण साडे-सतरा करोड रुपये मागच्या बजेटमध्ये हयाच्यासाठी खर्च करणार होतात. किती रुपये खर्च केले? आपण तिथे एक घमेले तरी माती टाकलेली आहे का? साडे-सतरा करोड रुपये कुठे गेले? की हयाचे वाटप झाले.

**शरदचंद्र वैरागडे :-**

सदर रोड आणि जे इतर डी.पी. रोडस त्याच्यासोबत आहेत. आपण त्या सर्व रोडसाठी कर्ज उभारणी करणार आहोत. कर्ज उभारणी करण्यासाठी आपण गव्हर्नमेन्टला अप्रुव्हलसाठी पाठविलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कर्ज उभारणीसाठी कुठले साडे-सतरा करोड देणार होतात. हे तुमच्या अंदाजपत्रकातील आहेत. मागच्या बजेटमधीलच आहेत. आपण हा विषय मागच्या बजेटमधील आणलेला आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

आपण हा खर्च लोन अकाउन्टमधून करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

माझे म्हणणे असे आहे की, हा विषय मागच्या बजेटमधील आहे. सन २००४ सालचा आहे. आपण कधीही विषय आणता. काहीतरी विषय आणता. काहीही कामे होत नाहीत.

**दिपक खांबीत :-**

जे अकरा डी.पी. रस्ते आहेत. आपण त्याच्याकरिता लोनमधून करायचे आहे अशी आपली तरतुद आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय एकच रस्त्यासाठी आहे. आपण एका रस्त्यासाठी रु. साडे-सतरा करोड दिलेले आहेत.

**दिपक खांबीत :-**

एकूण सगळे अकरा रस्ते आहेत. ते सगळे रस्ते रु. ६८ कोटीचे आहेत.

**जयंत पाटील :-**

मी वाचून दाखवितो. भाईंदर (पूर्व) जैसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडी लगत असलेला डी.पी. रोड तयार करणे.

**दिपक खांबीत :-**

मी त्याच्याबद्दलच बोलतो. दि. ५/०६/२००४ च्या मिटिंगच्या अकरा कामांना मंजुरी मिळाली होती. सदरचे रस्ते लोनमधून करायचे आहेत. आपण गव्हर्नमेन्टकडे बी.पी.एम.सी. ॲक्ट कलम १०९ मंजुरीकरिता प्रपोजल सादर केलेले आहे. मंजुरी आली की आपण नंतर टेन्डर काढणार आहोत आणि नंतर काम चालू करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आता मला दुसरी माहिती दया. मघाशी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी हा विषय सांगितलेला आहे. मी अजून थोडेसे डिटेलमध्ये सांगतो. भाईंदर (पूर्व) महाराष्ट्र मित्रमंडळ ते नवघर खाडीपर्यंतचा नाला दुरुस्तीचा विषय आहे. आपण या ठिकाणी नाला दुरुस्ती लिहिलेले आहे. ॲक्चुली ती दुरुस्ती नाही. आपण ते संपूर्ण गटार तोडून नवीन बनवित आहोत.

**दिपक खांबित :-**

ते दुरुस्ती आणि नुतनीकरणाचे आहे. करेक्शन करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

आपण या ठिकाणी हा शब्द का वापरलेला आहे. आपण या ठिकाणी नुतनीकरण बोलता. आपण आता मंजुरीसाठी जो विषय आणलेला आहे. त्याच्यामध्ये नुतनीकरण हा शब्द आहे. पुर्नबांधणी करणे. आपल्या शब्दामध्ये किती तफावत आहे ते बघा.

**दिपक खांबीत :-**

तो शब्द चुकून राहिला असेल तो पुर्नबांधणीचा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

महाराष्ट्र मित्रमंडळपासून कॉलेजपर्यंत किती अंतर आहे. ते आपण मला सांगा. आपण रु. ५० लाखाचे काम कॉलेजपर्यंत करता किंवा जे काम चालू आहे. ते अंतर किती फुटाचे आहे.

**दिपक खांबीत :-**

ते अंतर कमीत कमी २०० ते २५० मीटरपर्यंत आहे.

**जयंत पाटील :-**

आपण जर बजेट ठरविले तर आपल्याला ते अंतर माहिती असायला पाहिजे.

**दिपक खांबीत :-**

ते अंतर २५० मीटर आहे.

**जयंत पाटील :-**

किती फुटामध्ये आहे. म्हणजेच किती फुट आहे.

**दिपक खांबीत :-**

ते अंतर ६०० ते ७०० फुट आहे.

**जयंत पाटील :-**

ते अंतर ६४४ फुट आहे. इंच सांगू का?

**दिपक खांबीत :-**

६४४ फुट बरोबर आहे. मी मीटरमध्ये बोललो तुम्ही कन्व्हर्ट केले एवढेच आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पैशाची कशी विल्हेवाट लावायला घेतलेली आहे ते लक्षात घ्या. आपण या ठिकाणी ६४४ फुटासाठी रु. ५० लाख देत आहोत. त्या ठिकाणी रु. ५० लाखाची निविदा आहे. इकडे ८३० फुटासाठी म्हणजे आपण त्याच्यापुढचे जे गटार बनविणार आहोत. त्याचे अंतर खाडीपर्यंत ८३० फुट आहे. त्याच्यासाठी दीड कोटी रुपये काय वाढले. कसले भाव वाढले की टक्केवारी वाढली.

**दिपक खांबीत :-**

साहेब, भाव वाढलेले नाहीत. तुमचा जो गोडदेव नाका ते महाराष्ट्र मित्रमंडळपर्यंतचा जो नाला आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी सांगितले की मार्बल लावणार आहात का? मी तर म्हणतो की ग्रेनाईट लावले तरी एवढा खर्च होणार नाही.

**दिपक खांबीत :-**

तसे नाही. सगळे एस्टिमेट मेजरमेन्ट घेउनच केलेले आहे.

**रतन पाटील :-**

सिटी इंजिनियर, तुम्ही सांगा. आपण कशाला इंजिनियर आहात. कुठल्या डिग्र्या घेतलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

आपला कसला हिशेब आणि कसले कॅल्क्युलेशन चाललेले आहे? काय सांगणार? त्याच थातुरमातुर गोष्टी सांगणार आहे. या सभागृहाला मुर्ख बनवू नका.

**शरदचंद्र वैरागडे :-**

आपण हे मेजरमेन्ट घेउनच केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मग मला सांगा की ६४४ फुटाला रु. ५० लाख आणि ८३० फुटाला दीड कोटी रुपये. हे काय बजेट आहे?

**शरदचंद्र वैरागडे :-**

फाउन्डेशनच्या कन्डिशनप्रमाणे एस्टिमेटमध्ये आणि थिकनेसमध्ये फरक पडतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, कसले थिकनेस चाललेले आहे. थोडेसे चार-पाच इंच खोल होणार आहे. एवढेच आहे.

**शरदचंद्र वैरागडे :-**

एस्टिमेटमध्ये आहे ते सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सोन्याचा पत्रा वापरणार आहेत.

**जयंत पाटील :-**

हे सगळे काय होणार आहे? ते आम्हाला माहिती आहे. कसले थिकनेस? कोणाच्या तरी खिशाचे थिकनेस वाढणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हयांची पार्श्वभूमीसुध्दा सोन्याची आहे.

**जयंत पाटील :-**

हे काय चाललेले आहे? आपण हया गोष्टीला मंजुरी दयायची. ६४४ फुटला रु. ५० लाख आणि ८३० फुटला रु. दीड कोटी. ते काम करणारे इंजिनियर कोण आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

आपण विकास करित आहोत.

**जयंत पाटील :-**

जर जनतेच्या पैशाचा अशा त-हेचा अपव्यय होणार असेल तर आम्ही ते कधीही मंजुर करणार नाही. आम्ही हया सभागृहातील एक ज्येष्ठ नगरसेवक आहोत. गेल्या तीन टर्ममध्ये आम्ही या ठिकाणी नगरसेवक आहोत आणि असल्या गोष्टी कधी घडलेल्या नाहीत. तुम्हाला एक-एक इंचाचा हिशोब दयावा लागणार आहे.

**रतन पाटील :-**

हया बाबतीत उच्चस्तरीय चौकशी व्हावी.

**जयंत पाटील :-**

ही किती चुकीची गोष्ट चाललेली आहे. गोडदेव नाक्यापासून महाराष्ट्र मित्रमंडळपर्यंत रु. ५० लाख आणि महाराष्ट्र मित्रमंडळ ते कॉलेजपर्यंत रु. ५० लाख व त्याच्यापुढे ८३० फुटाला रु. दीड कोटी! काय व्हॅटस लागू झाला म्हणून असे चालले आहे काय?

**प्रफुल्ल पाटील :-**

वाट लागली.

**जयंत पाटील :-**

जनतेने टॅक्स भरला नाही तर आपण त्यांच्या घराला टाळा लावतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो की, आज जो ठराव दिला त्याला मी अनुमोदन दिलेले आहे. त्या ठरावावर मला बोलायचे आहे. ठरावाला अनुमोदन दिलेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, मला दोन शब्द बोलायचे आहेत. मी कधीपासून हात वर करते. प्रत्येकवेळेला तुम्ही बसा सांगता. मला बोलायला दोन मिनिटे देत नाही.

**जयंत पाटील :-**

आपण घन कचरा निर्मुलनचा एक विषय आणलेला आहे. डोंगरी येथे घन कचरा प्रकल्पासाठी कंपाउन्ड वॉल बांधणे रु. ९०,२०,०००/- याला आपण कधीच मंजुरी दिलेली आहे. आपण पूर्वी याला रु. ८० लाखाची मंजुरी दिलेली आहे. ते पैसे कुठे गेले? मंजुरी दिलेली आहे की नाही ते बावीस्करसाहेबांना विचारा.

**रतन पाटील :-**

सपाटीकरणाला गेले.

**जयंत पाटील :-**

रु. ८० लाखाची मंजुरी पूर्वीच दिलेली आहे. परत तोच विषय येतो.

**दिपक खांबीत :-**

ती मंजुरी स्टॅंडिंग कमिटीने दिलेली आहे. महासभेने दिलेली नाही.

**जयंत पाटील :-**

हा विषय महासभेपुढे आलेला आहे. तुम्ही असे काय म्हणता?

**दिपक खांबीत :-**

हा विषय महासभेपुढे आलेला नाही.

**मा. आयुक्त :-**

कचऱ्यासंबंधीचा विषय आलेला असेल. परंतु, हा विषय महासभेत आलेला नव्हता असे मला तरी वाटते.

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला विषय दाखवेन. मी या ठिकाणी विषयपत्रिका आणलेली नाही.

**दिपक खांबीत :-**

आम्ही पाहू.

**जयंत पाटील :-**

पाहू म्हणजे काय म्हणता?

**दिपक खांबीत :-**

तो विषय आलेला नाही.

**जयंत पाटील :-**

विषय आलेला आहे. रु. दीड कोटीचे काय कॅल्क्युलेशन आहे ते मला सांगा.

**दिपक खांबीत :-**

साहेब, तो नाला ३०० मीटरचा आहे. आपण संपूर्ण बॉक्स टाईप आर.सी.सी. नाला घेतलेला आहे. म्हणजेच तो आर.सी.सी. चा बॉक्स टाईप नाला आहे.

**जयंत पाटील :-**

आपण आता जे गटार केले. त्याच्यामध्ये आणि हयाच्यामध्ये चेन्जेस आहेत का?

**दिपक खांबीत :-**

होय. चेन्जेस आहेत.

**जयंत पाटील :-**

काय चेन्जेस आहेत? सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपण मार्बल्स लावणार आहात. आता आर.सी.सी. च केलेले आहे.

**दिपक खांबीत :-**

साहेब, त्या गटाराला सोलिंग कुठेच नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, बॉक्सला मराठीत खोका बोलतात. खोक्याचे काय?

**रतन पाटील :-**

खोक्याची तरतुद झालेली आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की माझ्या प्रभागामध्ये गटारावर स्लॅप घातले गेले त्याला अदयापपर्यंत जाळया लावल्या गेल्या नाहीत. शिवार गार्डन येथे जे गटार बनविले गेले. त्या गटारावर स्लॅप टाकण्याची फार गरज आहे. कारण तिथे सरदार वल्लभभाई पटेल ही आपली शाळा आहे. मुलांसाठी धोकादायक आहे. गेल्याच महिन्यात एक गरिबाची लहान मुलगी त्या गटारामध्ये पडून मेली. आपण त्या गटारावर नक्कीच स्लॅप टाकण्याची परवानगी दयावी. दुसरी गोष्ट म्हणजे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव मांडला त्याच्यामध्ये ज्या तरतुदी दाखविलेल्या आहेत. त्या ठरावास शिवसेनेतर्फे आम्ही संमती देत आहोत.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की जेव्हा मागे अर्थसंकल्पाची जी मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये एक हेड तयार करण्यासाठी आम्ही ठराव केलेला होता की भाईंदर पूर्व आणि पश्चिम जोडणारा जो पादचारी पुल आहे. तो वाढीव करायचा होता. तो श्री सत्यनारायण मंदिर मार्गाकडे वाढवायचा होता. आम्ही त्याच्यासाठी मंजुरी दिलेली होती की हा हेड तयार करा आणि जो ब्रीज रस्त्यावर उतरतो तो श्री सत्यनारायण मंदिर मार्गावर उतरावा अशी आम्ही सुचना केलेली होती. हे अत्यंत आवश्यक आहे. तो ब्रीज विस्तारीकरणाचा हयाच्यामध्ये कुठेही उल्लेख झालेला नाही. तोही त्याच्यामध्ये घ्यावा. कारण आपण जेवढया विकास कामांना मंजु-या दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये बहुतेक करुन ब-याच प्रभागांना जास्तीत जास्त प्राधान्य दिलेले आहे. उदाहरण घेतले तर मा. उपमहापौरसाहबांना थोडा राग येईल. त्यांच्या मिरा रोड परिसरात रु. १८,५०,००,०००/- च्या मंजु-या आहेत. मी फक्त रु. ५०,००,०००/- ची तरतुद करायला सांगितलेली होती. ती केलेली आहे. तेवढे

विस्तारीकरणासाठी काशीमिराला रु. १,२१,००,०००/- ची मंजुरी आहे. भाईंदर पूर्वेला रु. २,६८,००,०००/- ची मंजुरी आहे. भाईंदर पश्चिमला रु. १,२६,००,०००/- ची मंजुरी आहे. राई, मुर्धे, डोंगरी रु. १,९५,००,०००/- ची मंजुरी आहे. मिरा रोड येथे रु. १८,४८,००,०००/- ची एकूण मंजुरी आहे. तर मी तुमच्याकडे एवढीच मागणी करतो की माझी हयाच्यामध्ये रु. ५०,००,०००/- च्या तरतुदीचा एक हेड तयार केलेला आहे. पादचारी मार्ग विस्तारित करण्यासाठी श्री सत्यनारायण मंदिर मार्ग तिथे उतरण्यासाठी तो हेड केलेला आहे. त्यामुळे एवढा फायदा होणार आहे की जो रेल्वेस पॅरेलल कॅबीन रोड बोलतात तो रोड रुंद होण्यासाठी आपल्याला त्याच्याबरोबर फायदा होणार आहे आणि रहदारीला अडचण होणार नाही. या ठिकाणी माझ्या विषयाची नोंद घ्यावी ही तुम्हाला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर, आपल्या सुचनेची नोंद करुन घेतलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम ठराव मताला जाण्याअगोदर माझी एक सुचना आहे की, सत्ताधारी पक्षाने मांडलेल्या ठरावाच्याबाबत एक सुचना करते. प्रभाग क्र. २४ मधील औदयोगिक रस्ते हे नं. ८ चे काम आहे. प्रभाग क्र. २४ आणि प्रभाग क्र. ७ पूर्ण औदयोगिक पट्टाच आहे. मग प्रभाग क्र. २४ मधील घेतले तर त्याच्यामध्ये प्रभाग क्र. ७ सुध्दा इन्क्ल्युड करा. कारण संपूर्ण प्रभाग क्र. ७ हा औदयोगिक पट्टा आहे. म्हणून त्याच्यामध्ये प्रभाग क्र. ७ चा समावेश करावा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम तसाच माझा एक प्रॉब्लेम आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह तुम्ही सगळे शॉर्टकटमध्ये सांगा.

**रिटा शाह :-**

शॉर्टकट काय? आमची कामे राहिलेली आहेत ती सांगते. आता मोदी पटेल जो भाईंदर पश्चिमेचा मेन नाला आहे. आपण त्याच्यावर रोड बनविला. विनायक रोडपासून मधु अग्रवालपर्यंत आपला रोड बनवून झालेला आहे. तो रोड अधुरा आहे. मधु अग्रवालपासून शांतीनगरपर्यंत तो बनवायची फार गरज आहे. तो रस्ता पूर्ण करण्याची गरज आहे. तर त्या नाल्यावर रस्ता घ्यायला पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

आता सन्मा. सदस्या रिटा शाह ज्या बोलल्या आहेत. तर त्या नाल्याबाबत मी लेटर दिलेले आहे. मी शांतीनगरच्या नाल्याचे लेटर दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मतदानाला घ्या. सन्मा. सदस्यांनी लेखी स्वरुपात सुचना दयाव्यात.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मी ठरावाचे वाचन करतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्यांनी आपल्या सुचना लेखी दया. त्याचा विचार करण्यात येईल. ठराव मतदानाला घेण्यात येत आहे.

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की मी लेटर दिलेले आहे. आम्ही त्याच रोडचे लेटर दिलेले आहे. त्या जागेवर स्लॅप टाकायचा असे त्यात नमुद केलेले आहे. आम्ही ऑलरेडी पत्र टाकलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या कामाला तरतुद आहे. ती कामे तुम्ही स्विकारा. आमची त्याला मान्यता आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम आम्ही असे करु देणार नाही. त्यांचा बोलण्याचा काहीही अधिकार नाही. ते सर्वांना असे-असे करतात. म्हणजे काय वेडे समजतात का?

**प्रफुल्ल पाटील :-**

ठरावावर चर्चा आहे आणि तुम्ही ठराव वाचतात. मग कसे चालेल.

**मा. उपमहापौर :-**

ठराव मतदानाला टाकावा असा महापौरांनी आदेश दिलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौरांनी आदेश दिला असेल तर आता ठराव घेउन या. आम्ही जातो तुम्हांला काय करायचे ते करा.

**मा. उपमहापौर :-**

आपला जो ठराव आलेला आहे. दोन्ही ठराव या ठिकाणी आहेत आणि दोन्ही ठरावावर मतदान होत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला चर्चा करायची नसेल तर तुम्ही तसे सांगा. कोणी चर्चा करु नये असे सांगा. मग आम्ही डायरेक्ट ठराव करु. असे कसे चालेल. तुम्ही सभागृहाला खोटी माहिती देता. तेव्हा आम्हाला बोलायला नको काय? मा. उपमहापौरसाहेब, तुम्हीसुध्दा या सभागृहामध्ये खोटी माहिती देतात. आता तुम्ही मघाशी काय म्हणालात की खूप विकास कामे चाललेली आहेत. आम्हाला आनंद वाटला. आम्ही कधी बोललो नाही.

**रोहित सुवर्णा :-**

तुम्ही आम्हाला बोलायला देत नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब आपल्याला बोलायची संधी दिली. आपण बोललात. आपण ठराव मांडला. आपल्या ठरावावर मतदान होणार आहे. आपण खाली बसा. आपल्याला माझी विनंती आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बोलायला संधी दिली. परंतु, विकास कामांचा विषय आहे. मी माझ्या घरचा विषय मांडत नाही. आमचा विषय आहे. माझा ठराव आहे. जोपर्यंत चर्चा संपत नाही. तोपर्यंत मी बसणार नाही. माझी चर्चा झालेली नाही. मा. महापौर मॅडम, या ठिकाणी उपमहापौरांनी जी माहिती दिलेली आहे. ती माहिती चुकीची आहे हे मला या ठिकाणी सांगायचे आहे. कारण तुम्ही दिलेल्या माहितीनुसार हे सभागृह कुठलाही निर्णय घेत असते. पीठासीन अधिका-याला अशाप्रकारचा कुठलाही निर्णय घेता येत नाही. सचिवसाहेब, आपण खाली बसावे. मी उदया असे म्हणेन की माझी चर्चा झाल्यानंतर ठराव मागे घेईन तेव्हा तुम्ही काय करणार? मी तयारी दाखविली पाहिजे की ठराव मतदानाला टाकायचा आहे. ते म्हणाले परंतु मी तयारी दाखविलेली नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, आपण ठराव मागे घ्यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव मागे घेण्यापूर्वी मी सांगतो की तुम्ही सांगता त्या गोष्टीचा मी फार मोठा सन्मान ठेवतो आणि ठराव मागे घेतो. परंतु, तुम्ही हे कबुल कराल का की आता सभागृहात तुम्ही जी माहिती दिली. ती माहिती सूंपर्ण बजेट तरतुद आहे. मा. उपमहापौरसाहेब, आकडेवारी तुमच्यासमोर आहे ती बघा. त्याच्यामध्ये तुमच्या टोटल बजेटमध्ये ६८.४१ कोटीची भांडवली तरतुद आहे आणि महसुली तरतुद फक्त २७ कोटीची आहे. ही दोन्ही मिळून रु. ९६ कोटी होते. आता तुमच्याकडे जी कामे आलेली आहेत. ती कामे ८०-८८ कोटीच्या आसपास आहेत. परंतु, हयाच्यामध्ये रु. ४५ कोटी डी.पी. रोडसाठी आहेत. मग डी.पी. रोड एकसुध्दा बनविणार नाही का? तुम्ही ऐका आणि नंतर बोला. मला तुमचा अपमान करायचा नाही.

**मा. उपमहापौर :-**

प्रथम मी तुमचा डाउट क्लिअर करतो. आपण ते डी.पी.रोड विकसित करित आहोत. आपण त्याच्यासाठी लोन घेतो. आपण महसुली तरतुद काय-काय मर्ज करतो? घरपट्टी मर्ज करतो, ऑक्ट्रॉय मर्ज करतो. पाण्याची देयके मर्ज करतो. मग तुम्ही त्याच्यामध्ये रु. २७ कोटीची प्रोव्हिजन कशी काय सांगता? आपल्या हाउस टॅक्सचे एकूण उत्पन्न आहे ते तुम्हाला माहिती आहे का? तुम्ही रु. २७ कोटी कसे सांगता. आपल्याला संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ४८.४९ कोटी हाउस टॅक्सच्या माध्यमातून उत्पन्न आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

बरोबर आहे. हाउस टॅक्सच्या तरतुदीनंतर तुम्ही प्रशासकीय खर्च काढत नाही का? तुमच्या बजेटमध्ये अकाउन्ट हेडखाली बघा. मी तुम्हाला अकाउन्ट हेड वाचून दाखवितो. दोन मिनिटात वाचतो. पान क्र. २१ आणि पान क्र. २२ वर कार्यालय इमारत दुरुस्ती रु. ३५ लाख, रस्ते दुरुस्ती रु. ६.५०

करोड, सार्वजनिक शौचालय दुरुस्ती रु. ०.४० लाख आणि भांडवली हयाच्यामधून नवीन करायचे ते रु. २५ लाख. तळी, विहिरी दुरुस्ती, नवीन करायचे रु. २५ लाख, जुनी दुरुस्ती करायचे रु. १० लाख, गटारे दुरुस्ती रु. २ कोटी आहेत. सुवर्ण जयंती योजना रु. १० लाख, दुर्बल घटक रु. ५५ लाख, महिला व बालकल्याण समिती रु. ५५ लाख ते बरोबर आहेत. रु. ५५ लाखाच्या तरतुदीप्रमाणे तुम्ही कामे आणलेली आहेत. त्याला काहीही विरोध नाही. पुढे बघा. आमदार, खासदार फन्ड फक्त रु. २१ लाख दाखविलेला आहे. तुम्हाला तो दुरुस्त करुन घ्यावा लागेल. त्याला आमची मंजुरी आहे. परंतु, पुढे नवीन रस्ते बांधकामाला रु. ६० कोटीची मंजुरी दाखविलेली आहे. ही बजेट तरतुद आहे. नवीन गटारे, नाल्यांना रु. १५ कोटीची तरतुद दाखविलेली आहे. नगरभवन विकासाची रु. ४१ लाखाची भांडवली तरतुद आहे. ती तरतुद महसुली नाही. विकास आराखडयाची जागा संपादन आणि विकास करण्यासाठी तुम्ही रु. २ कोटीची तरतुद दाखविलेली आहे. तुम्ही महसुली तरतुद बघा. तुम्हाला वाचून दाखवितो. डी.पी.रोड महसुली तरतुद रु. ८ कोटी आहे. त्याच्यानंतर पूर्व, पश्चिम चौपाटी रु. १ कोटीची तरतुद आहे. आता तुम्ही सगळी तरतुद वापरल्यानंतर चौपाटी बांधणार आहात का? १०० टक्के बांधु शकत नाही. डी.पी. रोड बांधू शकत नाही. आर.ओ.बी. ची रु. १ कोटीची तरतुद आहे. आपण या ठिकाणी जास्त मागत आहात. छत्रपती शिवाजी महाराज मार्गाची रु. ३ कोटीची तरतुद आहे आणि तुम्ही रु. ११ कोटी मागतात. साहेब, कुठून देणार? तुम्ही बजेट व्यवस्थित आणा. आता तुमची रु. ३ कोटीची तरतुद आहे. मी कुठल्याही वैयक्तिक भावनेतून बोलत नाही. मा. उपमहापौरसाहेब आणि मा. महापौर मॅडम, कृपया मी तुम्हाला पुन्हा विनंती करतो की जे काही करायचे ते कायदयाने करा. तुम्ही, आम्ही, सगळे शहराच्या विकासासाठी भांडत आहोत. या सभागृहामध्ये राजकिय भाग वेगळा ठेवा. या शहराचे चांगले होईल असा विचार करा. तुम्ही जी महसुली तरतुद केलली आहे. या ठिकाणी ती रु. २७ कोटीची आहे. त्याच्यावर एकही महसुली तरतुद नाही. भांडवली तरतुद रु. ६८ कोटीची आहे. परंतु, तुम्ही रु. ६८ कोटीमध्ये रु. ४५ कोटी रुपये कर्ज घेणार आहात. अजून ते मिळाले नाही. ते मिळायचे आहेत. ते मिळेल असे गृहित धरु. दोन्हीची टोटल मारा. तुमच्याकडे फक्त रु. ९६ कोटीची टोटल तरतुद आहे. तुम्हाला रु. ९६ कोटीतून शहरातील सगळे डी.पी. रस्ते करायचे आहेत. तुम्हाला जैसल पार्कची चौपाटीसुध्दा करायची आहे. त्याच्यानंतर जागासुध्दा संपादन करायची आहे. अजून महसुली तरतुदीमधून दुसरे डी.पी. रोडसुध्दा करायचे आहेत. रु. ४५ कोटी भांडवली तरतुद आहे आणि महसुली तरतुद रु. ८ कोटी आहे. म्हणजे तुम्हाला रु. ५३ कोटीचे नवे रस्ते करायचे आहेत. आजच्या सभेत विकास आराखडयाचा फक्त एकच डी.पी. रोड आलेला आहे. त्याच्या व्यतिरिक्त एकही नाही. तुमची रु. ३ कोटीची छत्रपती शिवाजी महाराज मार्गाची तरतुद आहे. तुम्ही आता रु. ११ कोटी मागतात. तुम्ही रु. ८ कोटी कुठून आणणार हे मला सांगा. त्याच्यानंतर आर.ओ.बी. ची मंजुरी आहे. तुमची ती रु. १ कोटीचीच तरतुद आहे. म्हणून मी मघापासून तुम्हाला सांगतो. साहेब, मी बजेटवर पूर्ण अभ्यास केलेला माणूस आहे. मी तुम्हाला पूर्ण संधीसुध्दा दिली की जर तुम्ही करायला पाहिजे होते तर मागच्या तीन वर्षाचे आर्थिक लेखे दया. सन्मा. सदस्यांना कुठेतरी कळू दया. आता सन्मा. सदस्यांनी बाहेर जाउन म्हटले की आम्ही रु. १ कोटी तरतुद केलेली आहे. ही सगळी तरतुद आजच्या सगळया कामामध्ये १०० टक्के संपली. मग पुढच्या मिटिंगच नाही आहेत का? म्हणजे एकही आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी नाही. आम्ही नवीन बजेट करु असे तुम्ही करा किंवा बजेटमध्ये अजून महसुली उत्पन्नाचा भाग बघु. तुम्ही मला एवढे समाधान करुन देत असाल तर मी आता ठराव मागे घेतो. अन्यथा माझा ठराव मतदानाला टाका.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब, आपण आता ज्या सुचना केलेल्या आहेत. हया सुचनांप्रमाणे एवढया तरतुदी एका झटक्यात होउ शकत नाहीत. पावसाळा समोर येत आहे. आपण आज ज्या तरतुदी केलेल्या आहेत. हया तरतुदी म्हणजे कायमस्वरुपी तरतुदी केलेल्या नाहीत. आपण प्रत्येक वर्षी बजेट प्रोव्हिजन करित असतो. प्रत्येक वर्षी विकासाचे टप्पे निश्चित करित असतो. आपण या विषयावर आता मतदानाचे सांगितले सन्मा. सचिवांना विनंती करतो की आपण मतदान प्रक्रियेला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. महेन्द्रसिंग चौहाण आणि अनुमोदन श्री. एस.ए. खान यांचा आहे. दुसरा ठराव सुचक श्री. प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदक श्रीम. सुधा गोयंका यांचा आहे. मी नियमाप्रमाणे दुसरा ठराव मतदानाला टाकतो. मी प्रथम ठरावाचे वाचन करतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०७ करिता सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील ह्यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०७ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम)

**ठराव :-**

महानगरपालिकेने सन २००४-०५ या आर्थिक वर्षात हाती घेतलेल्या महसुली खर्चाची व भांडवली खर्चाची विकास कामे मागील अंदाजपत्रकात तरतुद नसतानाही हाती घेतलेली आहे. सदर विकास कामांची देयके रु. ६६,८१,८०१/- देय आहेत. तसेच चालू कामाची देयके कामे पुर्ण झाल्यानंतर मनपास प्राप्त होणार आहेत. सदर कामांची निविदा रक्कम रु. ५.८३ कोटी असून या दोन्ही रकमा चालू अंदाजपत्रकातील अनुज्ञेय महसूली उत्पन्न व भांडवली खर्चासाठी उभारवायाचे कर्ज यातून चुकवाव्या लागणार आहेत.

ज्याअर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम १९४९ चे कलम ९३ व ९४ अन्वये मनपाने कोणत्याही महापालिका सदस्यांना मागील दोन वर्षाचे वार्षिक / त्रेमासिक आर्थिक लेखे सादर केलेले नसल्याने मनपाच्या आर्थिक स्थितीचा बोध होत नाही. ज्या आर्थिक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ७ मधील ७३/७४ नुसार बांधकामे / विकास कामे मंजूर करण्यासाठी कोणतेही नियम तयार केलेले नाहीत त्या अर्थी अशा प्रकारचे नियम तयार केलेले नसल्याने आतापर्यंत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहीता (१९७१) नुसारच महानगरपालिकेच्या लेखा विभाग व बांधकाम तसेच पाणीपुरवठा व इतर विभागाचे काम चालू आहे.

सदर लेखा संहीतेमधील तरतूदी पाहता नियम क्र. १५८ नुसार नविन बांधकामाचे आराखडे, नकाशे, व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रस्तुत केली आहे.

पुढील नियम क्र. १५९, १६०, १६१ व १६२ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रशासकीय मंजुरी व तांत्रीक मंजुरी घ्यावयाचे असते.

नियम क्र. १६२ व १६३ नुसार बांधकामांना आंतिम मंजुरी व बांधकाम सुरुवात करावयाची मंजुरी आहे.

दरांची अनुसूची व मुळअंदाजातील फेरबदल नियम क्र. १६६ व १६७ द्वारे करण्यात येत असून नियम क्र. १६९ मध्ये निविदा काढणे मंजूर करणे इत्यादी कार्यवाही प्रस्तुत केली आहे.

यापुढे नियम क्र. १७०, १७१, १७३ खालिल कार्यवाही पुर्ण केल्या नंतर नियम क्र. १७४ नुसार ठेकेदाराची देयके प्रदान करावयाची असतात.

आज प्र. क्र. ७ नुसार विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत विषय आणला असून सदर अंदाजपत्रकास सन २००५-०६ या वर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदी नुसार सदर अंदाजपत्रकात २००५-०६ मधील विकासकामांसाठी व दुरुस्ती कामासाठी कामांची तरतुद केली असून रु. १,२८,६८,६७,१८१/- ची कामे प्रस्तावित केली आहे. अंदाजपत्रकातील तरतुदी पाहता सन २००५-०६ बांधकाम विभागातील महसुली खर्च (रस्त्या व इतर ७.३५ कोटी रुपयांची सुवर्णजयंती योजना व दुर्बल घटक व दलित वस्ती सुधारणा १.१५ कोटी ची तरतूद असून) भांडवली खर्च (नविन रस्ते नाले तळी विहीरी २२.५० कोटी ची तरतूद केलेली आहे. व कर्ज निधीतून ४५ कोटी रुपयाची तरतूद केली आहे.) तसेच गटार दुरुस्ती (महसूली खर्च रु. २ कोटी) व भुयारी गटार योजना (भांडवली खर्च या साठी रु. २५ कोटी कर्ज निधीतून तरतूद केलेली आहे. वरील सर्व तरतूदी पाहता मागील वर्षात पुर्ण झालेल्या विकासकामांची प्रलंबीत देयके व मागील वर्षात मंजूर झालेल्या व चालू वर्षात सुरु असलेल्या विकास कामांची देयके लक्षात घेता प्रकरण क्र. ७ मधील विकासकामे अ.क्र. १ ते ६० यासाठी अल्प तरतूद उपलब्ध आहे. लेखासंहीता १९७१ मधील नियम नुसार आर्थिक तरतुद नसल्यास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देता येत नाही प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यामध्ये आर्थिक तरतूद किती उपलब्ध आहे. प्रकरण क्र. ७ मधील अ.क्र. १ ते ६० मधील खालील विकास कामांच्या बाबत कायदेशीर प्रश्न उद्भवतो.

| | | |
|---|---|---|
| अ.क्र. ४ | भाईंदर पूर्व उड्डाणपुल जंक्शन ते साईबाबा मंदिर रस्ता रु. २.५० कोटी | सद्याच्या हा रस्ता सुस्थितीत असून फक्त पॅचवर्क करणे सोयीचे आहे. |
| अ.क्र. ९ | एस. एन. कॉजेल ते खाडीपर्यंत नाला पुर्नबांधनी करणे रु. १.५५ कोटी | महाराष्ट्र मित्र मंडळ ते एस. एन. कॉलेज पर्यंत ह्या नाल्याच्या बांधणीसाठी रु. ५०,००,०००/- लाखाची निविदा काढण्यात आलेली आहे व त्याचे काम चालू आहे |

| | | |
|---|---|---|
| | | गोडदेव नाका ते महाराष्ट्र मित्र मंडळ पर्यंत रु. लाखाची निविदा क्र. दि. काढलेली आहे.<br><br>महाराष्ट्र मित्र मंडळ ते खाडीपर्यंतच्या अंतरापेक्षा जास्त असूनही सदर अ.क्र. ९ च्या विकास कामांना चुकीचा अंदाजित खर्च दाखविला आहे. |
| अ.क्र. २९ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग डांबरीकरण<br>मुळ अंदाजपत्रक रु. २७,४८,५४,९४१/-<br>सुधारीत अंदाजपत्रक रु. ३८,७७,८२,६३४/- | सदरचे काम मागील आर्थिक वर्षात पुर्ण झालेले आहे. त्यामुळे मंजुरीचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| अ.क्र. ३० | भाईंदर पुर्व व पच्छिम यांना जोडणारा रेल्वे उड्डाणपुल व जोडरस्ते<br>मुळ अंदाजपत्रक रु. १६,५२,५१,५००/-<br>सुधारीत अंदाजपत्रक रु. २१,०७,००,०००/- | सदर काम आर्थिक वर्ष २००३-०४ रोजी पुर्ण झालेले आहे. |

वरील प्रकरण क्र. ७ मधील अ.क्र. २९ व ३० मधील विकास कामे यापुर्वी च मंजूर झाल्यामुळे नियमाप्रमाणे आता आर्थिक प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यातील वाढीव कामाची टक्केवारी मुळ अंदाजपत्रकापेक्षा १०% च्या आत असल्यास मा. आयुक्तांनी स्वतःच्या अधिकारात देण्याची तरतुद कायद्यात आहे. अंदाजपत्रकात फक्त डी. पी. रोड वरील व जागा संपादन व विकास, पुर्व पश्चिम चौपाटी यातील बजेट तरतुद वगळता फक्त रु. ४१.१४ कोटीची तरतुद वापरता येईल.

वरील प्रमाणे बऱ्याचश्या विकासकामाबद्दल तयार केलेली अंदाजपत्रके ही यापुर्वीच संपूर्ण पुर्ण झालेली आहेत तरी सुद्धा पुन्हा प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसाठी आणलेली आहेत.

वरील सर्वबाबी पाहता लेखासंहिता नियम असलेल्या तरतूदीचा भंग करुन मुंबई प्रांतीक महानगरपालिका १९४९ नियम क्र. ७४ मधील कार्यवाही नकरता व नियम ९३ व ९४ नुसार ही आर्थिक लेखे लोकप्रतिनिधींना दिलेली नसल्याने व अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद नसल्याने सदर प्रकरण प्रशासनाने त्याचे पुनरावलोकन करुन आर्थिक तरतुदीसह व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मंजूरीसाठी पुन्हा महासभेपुढे आणावे असा ठराव मांडत आहे.

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदक श्रीम. सुधा गोयंका यांच्या ठरावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी कृपया उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर
२) अग्रवाल धनराज नंदलाल
३) कोलासो जेम्स इजिदोर
४) जानी कैलासबेन दिनेशचंद्र
५) शाह रक्षा एस्.
६) नरावत भवरीकुंवर
७) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
८) शाह रिटा सुभाष
९) रतन कृष्णा पाटील
१०) पाटील अनंत रामचंद्र
११) शुभांगी सिताराम नाईक
१२) करंबेळे प्रियांका प्रकाश
१३) पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१४) भोईर शशिकांत जगन्नाथ

१५)	पाटील लीला गुरुनाथ
१६)	गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१७)	संगिता विजय म्हात्रे
१८)	मिलन वसंत म्हात्रे
१९)	तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
२०)	म्हात्रे नयना गजानन
२१)	घोन्सालवीस जोजफ जॉन

असे ठरावाच्या बाजूने एकूण २१ सदस्य आहेत. या ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१)	श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२)	श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३)	श्री. पाटील मोहन मधुकर
४)	श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
५)	श्रीम. सपार उमा विश्वनाथ
६)	श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
७)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८)	श्री. शेख आसिफ गुलाब
९)	श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१०)	श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११)	श्री. नलावडे दिनेश द.
१२)	श्री. पांडे हंसु कमलकुमार
१३)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१४)	श्री. पाटील जयंत महादेव
१५)	श्री. माळी रविंद्र भीमदेव
१६)	श्री. घरत केशव रामभाऊ
१७)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१८)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१९)	श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर
२०)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२)	श्री. पटेल आसिफ गुलाम
२३)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४)	श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२५)	श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२६)	श्री. खान शफीक अहमद
२७)	श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२८)	श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२९)	श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
३०)	श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३१)	श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३२)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
३३)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३४)	श्री. मेहता नरेंद्र
३५)	श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३६)	श्री. पाटील मिलन गोविंदराव
३७)	श्री. पाटील चिंतामण कमलाकर
३८)	श्री. पाटील रोहिदास आत्माराम
३९)	श्री. शहा शशिकांत रतिलाल

ठरावाच्या विरोधात ३९ सदस्य आहेत. आता मी दुसरा ठराव मतास टाकतो, प्रकरण क्र. ७ करिता जो पहिला ठराव आलेला आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०७ करिता सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. ७ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम)

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर अंदाजपत्रकांकरीता सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) न्यू साई कृपा कॉम्पलेक्स ते गोल्डन नेस्ट डी.पी. रोड पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १२,७५,२१५/- |
| २ | भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग वरील दिपक हॉस्पीटल ते नवराज अपार्टमेंट पर्यंत सी.सी. नाला बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३९,०५,१००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. २५ मधिल रोजवुड बिल्डींग ते कनाकिया रोडला जोडणारा रस्ता तयार करणे. | रु. २१,४४,४५०/- |
| ४ | भाईंदर (पूर्व) उड्डाणपूल जंक्शन ते साईबाबा मंदिर रस्ता तयार करणे. | रु. ९२,४६,१५५/- |
| ५ | मुख्य कार्यालय इमारतींच्या तळ मजल्यावर मुख्य दरवाजा ते जीना व लिफ्ट पर्यंत लॅंडस्केपींग व सुशोभिकरण करणे व अद्ययावत टाईल्स बसविणे. | रु. १४,४८,५००/- |
| ६ | भाईंदर पूर्व चिंतामणी अपार्टमेंट ते खाडी कडे नाला नुतनीकरण करणे. | रु. २०,५०,०००/- |
| ७ | भाईंदर (पूर्व) एस.व्ही रोड रस्ता पृष्ठीकरण करणे. | रु. ११,६४,७००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. २४ औद्यागिक विभागातील नविन रस्ते व गटार दुरुस्ती करणे. | रु. १५,००,५००/- |
| ९ | भाईंदर (पूर्व) एस. एन. कॉलेज पासून खाडी पर्यंत नाला पूर्नबांधणी करणे. (भाग-२) | रु. १,५५,००,०००/- |
| १० | रा.म.क्र.८ वरील श्री. महाविष्णू मंदिर ते नविन गावठाण पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतून) | रु. ४५,७०,५८१/- |
| ११ | माशाचा पाडा रस्ता ब्रिज ते तलावापर्यंत सोलिंगसह, खडीकरण व डांबरी करण करणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतुन) | रु. ४१,३७,८३२/- |
| १२ | भाईंदर पूर्व मांडवी पाडा येथे सेंट झेवियर्स हायस्कुल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतुन) | रु. ३१,२८,७५८/- |
| १३ | मिरा रोड आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये नागरीकांकरीता रक्तपेढी, वातानुकुलीत शवागृह, दवाखाना व वाचनालाय इ. करीता इमारत बांधणे (आमदार निधीतून) | रु. १,३१,४७,६७५/- |
| १४ | चेना गांव येथे हॉटेल हिल व्ह्यु ते शाळेपर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रु. १२,००,०००/- |
| १५ | चेणागांव येथे नविन शाळागृह इमारत बांधणे | रु. २८,००,०००/- |
| १६ | प्रभाग क्र. १० मध्ये घोडबंदर रोडवर वर्सोवा जंक्शन व प्रेमसन्स कॉटेज जवळ कलवर्ट बांधणे. | रु. २०,००,०००/- |
| १७ | काशिमिरा येथे पोलिस स्टेशन जवळील स्मशानभूमी सुशोभित करणे. | रु. २०,००,०००/- |
| १८ | रा.म.क्र. ८ वर जनतानगर येथे सी.सी. पाथवे व चॅनल टाकणे. | रु. १३,००,०००/- |
| १९ | रा.म.क्र. ८ वर पेणकरपाडा येथे गावंड चाळ, वर्तक अळी, प्राथमिक शाळेचा परिसर, किसननगरी अंतर्गत सी.सी. पाथवे व लादी व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १९,९०,०००/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| २० | मिरा गांव येथे मार्केट, कर व आरोग्य कार्यालय बनविणे | रु. १३,५०,०००/- |
| २१ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या डाव्या बाजुस ते सिल्व्हर पार्क रस्त्यापर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ७१,५२,७१०/- |
| २२ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजुस जेम्मू काष्मीर बँक ते शांतीपार्क नाल्यापर्यंत गटार व स्लॅब टाकणे. | रु. ४०,९०,५४०/- |
| २३ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजुस निलसागर हॉटेल ते शांती पार्क नाला पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ५०,०६,८२०/- |
| २४ | मिरारोड रेल्वे उड्डाणपूल लोढा पार्क ते नरेंद्र पार्क पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे | रु. ७५,०३,९००/- |
| २५ | मिरा रोड चंद्रेश रिसोर्ट ते लोढा पार्क ते नरेंद्रपार्क पर्यंत रस्त्याच्या उजव्या बाजूस गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ६१,१२,४८०/- |
| २६ | मिरा रोड नरेंद्र पार्क ते शांती नगर से-1 रस्त्यापर्यंत डाव्या बाजूस नाला बांधून स्लॅब टाकणे. | रु. ३५,०४,१६०/- |
| २७ | मिरा रोड शांतीनगर शॉपींग सेंटर ते मच्छीमार्केट पर्यंत नाल्याची पूर्नबांधणी करुन स्लॅब टाकणे. | रु. ८७,०१,१५०/- |
| २८ | मिरारोड येथे शगुन हॉटेल ते सृष्टी नविन पोलिस चौकी पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूस आर.सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रु. १,३५,६२,४९०/- |
| २९ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (काशिमिरा रोड) उड्डाणपूल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पर्यंत रस्ता रुंदीकरण, डांबरीकरण करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी. नाल्यासह फुटपाथ बांधणे. | |
| | मुळ अंदाजपत्रक | रु. २७,४८,५४,९४१/- |
| | सुधारित अंदाजपत्रक | रु. ३८,७७,८२,६३४/- |
| ३० | भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे वरील उड्डाणपूल व जोडरस्ते बांधणे. | |
| | मुळ अंदाजपत्रक | रु. १६,५२,५१,५००/- |
| | सुधारित अंदाजपत्रक | रु. २१,०७,००,०००/- |
| ३१ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर डाव्या बाजूस नाला बनविणे. | रु. ४०,१२,३००/- |
| ३२ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून सृष्टी जूनाब्रिज पर्यंत गटार बांधणे (दोन्ही बाजुस) | रु. १,००,१८,४५०/- |
| ३३ | मिरारोड शिवपूजा इमा. ते जांगीड इस्टेट (हेरलपार्क) पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ४४,२५,२७०/- |
| ३४ | मिरारोड गौरव गॅलक्सी ते शगून हॉटेल पर्यंत आर.सी.सी. नाला बनविणे. | रु. ६२,९१,३७०/- |
| ३५ | मिरारोड शांती नगर सर्कल ते एस.टी.पी. पर्यंत डाव्या बाजूस सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रु. ४८,४२,५००/- |
| ३६ | मिरारोड ग्रीन व्ह्यू इमारत ते गौरव गॅलक्सी मध्ये रस्ता बनविणे व एका बाजुस गटार बनविणणे. | रु. ३६,७९,४००/- |
| ३७ | मिरारोड विजय पार्क येथे शिवपूजा इमारत ते रश्मी उत्सव पर्यंत रस्ता उंच करुन मजबूतीकरण करणे. | रु. ४७,२१,७५०/- |
| ३८ | मिरारोड लोढा पार्क ते रेल्वे ओव्हर ब्रिज जंक्शन पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे. | रु. ४८,५६,६८०/- |
| ३९ | मिरारोड येथे गितानगर ते सोनाली हॉटेल रोड पर्यंत गटार बांधणे | रु. २२,५७,७२५/- |
| ४० | मिरारोड येथे जांगीड सर्कल ते सृष्टी कडे जाणाऱ्या रोडवर आर.सी.सी. डिव्हायडर बसविणे. | रु. २७,९२,१२०/- |
| ४१ | मिरारोड येथे स्टेशन सर्कल ते साईल फराझ व शितलनगर जंक्शन ते सिंगापूर प्लाझा आर.सी.सी. डिव्हायडर बसविणे. | रु. १५,७०,५७०/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ४२ | मिरारोड साईबाबा नगर येथे अरिहंत टॉवर ते वैभव दर्शन ते एम.टी.एन.एल. रस्त्यावर गटार दुरुस्ती करणे तसेच नविन गटार बांधणे. | रु. १२,७४,९००/- |
| ४३ | मिरा रोड पार्श्वनगर ते एन. एच. हायस्कूल पर्यंत गटार बांधणे. | रु. १४,०७,३५०/- |
| ४४ | मिरा रोड तुंगा हॉस्पीटल ते नर्मदा पॅराडाईज पर्यंत रस्ता रुंदीकरण व गटार बांधणे. | रु. १२,५१,१५०/- |
| ४५ | मिरा रोड चंद्रेश अभिषेक ते चंद्रेश महल रस्ता रुंदीकरण व मजबूतीकरण करणे. | रु. १४,९६,४९०/- |
| ४६ | मिरा रोड येथे एस. के. स्टोन ते उघाडीपर्यंत नाला बांधणे व रस्ता दुरुस्ती करणे. | रु. १३,७७,०६०/- |
| ४७ | शांतीनगर सेक्टर ११ पासून ते सिंगापूर प्लाझा पर्यंत रस्ता रुंद करणे व डीव्हायडर बसविणे. | रु. ५२,३६,९१०/- |
| ४८ | भाईंदर पूर्व जय अंबे इंडस्ट्रीयल इस्टेट मधिल अंतर्गत सी.सी. गटार व सी.सी. रस्ते करणे. | रु. १५,००,०००/- |
| ४९ | चौक धक्का येथे रॅम्प बनविणे | रु. ३०,००,०००/- |
| ५० | उत्तन पातान बंदर पॉलची वाडी, येथिल अंतर्गत रस्ते सी.सी. बनविणे. | रु. १५,००,०००/- |
| ५१ | पाली येथे मराठी शाळेपासून सुर्या निकेतन हॉस्पीटल पर्यंत रस्ता पूर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. २५,५०,०००/- |
| ५२ | मुर्धा येथिल स्मशानभूमी जवळील गार्डन विकसित करणे. | रु. १२,३०,०००/- |
| ५३ | मुर्धा खाडी येथे राम यादव यांच्या घराच्या बाजूला शौचालय बांधणे. | रु. २,५०,०००/- |
| ५४ | डोंगरी येथे घन कचरा प्रकल्पासाठी कंपाऊंड वॉल बांधणे. | रु. ९०,२०,०००/- |
| ५५ | भाईंदर (प) बुरहानी नगर ते चिंतामणी पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १८,२७,७००/- |
| ५६ | भाईंदर (प) क्रांतीनगर येथिल हनुमान मंदिर ते आरोग्य केंद्रापर्यंत नाला बांधणे. | रु. ५१,८६,७००/- |
| ५७ | भाईंदर (प) गितानगर येथिल भवानीपार्क ते कपोलवाडी पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ११,६८,१००/- |
| ५८ | भाईंदर (प) मांडली तलाव ते टेंभा हॉस्पीटल पर्यंतचा उर्वरीत डी.पी. रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे. | रु. २७,८४,७००/- |
| ५९ | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल ते रेल्वे उड्डाणपूल क्रॉस रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. १६,३९,५००/- |
| ६० | फाउंटन हॉटेल जंक्शन ते ठाणे जकात नाका येथिल रस्त्याच्या दुभाजक येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ७८,००,०००/- |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत येत आहे. अ.क्र. १०, ११ व १२ ची कामे महानगरपालिका निधितून करण्यात यावीत व दलित वस्ती सुधारण योजनेची निधी प्राप्त झाल्यावर महानगरपालिका निधीत जमा करण्यात यावा. अ.क्र. १३ च्या कामी आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. परंतू निधी उपलब्ध न झाल्यास उर्वरीत खर्च महानगरपालिकेच्या निधितून करण्यात यावा. अ.क्र. २९ व ३० चे काम वगळता इतर सर्व कामे मा. स्थायी समिती सभेपूढे ठेऊन प्राधान्य यादी ठरवून अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार निविदा मागविण्यांत याव्यात. तसेच या पुढे रु. ५०.० लक्ष पर्यंतच्या कामांना मा. स्थायी समिती सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात यावी. तसेच वरील कामांव्यतिरिक्त नगरसेवकांच्या प्रभागातील इतर कामांची अंदाजपत्रके तयार करून मा. स्थायी समितीपुढे सादर करावीत असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. महेन्द्रसिंग चौहाण आणि अनुमोदक श्री. एस. ए. खान. आहेत. या ठरावाच्या बाजूने असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे

२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम

३)	श्री. पाटील मोहन मधुकर
४)	श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
५)	श्रीम. सपार उमा विश्वनाथ
६)	श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
७)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८)	श्री. शेख आसिफ गुलाब
९)	श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१०)	श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११)	श्री. नलावडे दिनेश द.
१२)	श्री. पांडे हंसु कमलकुमार
१३)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१४)	श्री. पाटील जयंत महादेव
१५)	श्री. माळी रविंद्र भीमदेव
१६)	श्री. घरत केशव रामभाऊ
१७)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१८)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१९)	श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
२०)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२)	श्री. पटेल आसिफ गुलाम
२३)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४)	श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२५)	श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२६)	श्री. खान शफीक अहमद
२७)	श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२८)	श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२९)	श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
३०)	श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३१)	श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३२)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
३३)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३४)	श्री. मेहता नरेंद्र
३५)	श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३६)	श्री. पाटील मिलन गोविंदराव
३७)	श्री. पाटील चिंतामण कमलाकर
३८)	श्री. पाटील रोहिदास आत्माराम
३९)	श्री. शहा शशिकांत रतिलाल

या ठरावाच्या बाजूने ३९ सदस्य आहेत. आता ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर
२)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
३)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
४)	श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
५)	श्रीम. शाह रक्षा एस्.
६)	श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंअ
७)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
८)	श्रीम. शाह रिटा सुभाष

९) श्री. रतन कृष्णा पाटील
१०) श्री. पाटील अनंत रामचंद्र
११) श्रीम. शुभांगी सिताराम नाईक
१२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
१३) श्री. पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१४) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
१५) श्रीम. पाटील लीला गुरुनाथ
१६) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१७) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
१८) श्री. मिलन वसंत म्हात्रे
१९) श्री. तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
२०) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
२१) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन

ठरावाच्या विरोधात २१ सदस्य आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. महेन्द्रसिंग चौहाण आणि अनुमोदक श्री. एस. ए. खान यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. यांच्या बाजूने ३९ मते पडली आणि विरोधात २१ मते पडलेली आहेत.

**प्रकरण क्र. ०७ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम)

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर अंदाजपत्रकांकरीता सन २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) न्यू साई कृपा कॉम्पलेक्स ते गोल्डन नेस्ट डी.पी. रोड पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १२,७५,२१५/- |
| २ | भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्ग वरील दिपक हॉस्पीटल ते नवराज अपार्टमेंट पर्यंत सी.सी. नाला बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३९,०५,१००/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. २५ मधिल रोजवुड बिल्डींग ते कनाकिया रोडला जोडणारा रस्ता तयार करणे. | रु. २१,४४,४५०/- |
| ४ | भाईंदर (पूर्व) उड्डाणपूल जंक्शन ते साईबाबा मंदिर रस्ता तयार करणे. | रु. ९२,४६,१५५/- |
| ५ | मुख्य कार्यालय इमारतींच्या तळ मजल्यावर मुख्य दरवाजा ते जीना व लिफ्ट पर्यंत लँडस्केपींग व सुशोभिकरण करणे व अद्ययावत टाईल्स बसविणे. | रु. १४,४८,५००/- |
| ६ | भाईंदर पूर्व चिंतामणी अपार्टमेंट ते खाडी कडे नाला नुतनीकरण करणे. | रु. २०,५०,०००/- |
| ७ | भाईंदर (पूर्व) एस.व्ही रोड रस्ता पृष्ठीकरण करणे. | रु. ११,६४,७००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. २४ औद्यागिक विभागातील नविन रस्ते व गटार दुरुस्ती करणे. | रु. १५,००,५००/- |
| ९ | भाईंदर (पूर्व) एस. एन. कॉलेज पासून खाडी पर्यंत नाला पूर्नबांधणी करणे. (भाग-२) | रु. १,५५,००,०००/- |
| १० | रा.म.क्र.८ वरील श्री. महाविष्णू मंदिर ते नविन गावठाण पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतून) | रु. ४५,७०,५८१/- |
| ११ | माशाचा पाडा रस्ता ब्रिज ते तलावापर्यंत सोलिंगसह, खडीकरण व डांबरी करण करणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतुन) | रु. ४१,३७,८३२/- |
| १२ | भाईंदर पूर्व मांडवी पाडा येथे सेंट झेवियर्स हायस्कुल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे (दलित वस्ती सुधारणा योजनेतुन) | रु. ३१,२८,७५८/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १३ | मिरा रोड आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये नागरीकांकरीता रक्तपेढी, वातानुकुलीत शवागृह, दवाखाना व वाचनालाय इ. करीता इमारत बांधणे (आमदार निधीतून) | रु. १,३१,४७,६७५/- |
| १४ | चेना गांव येथे हॉटेल हिल व्ह्यु ते शाळेपर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रु. १२,००,०००/- |
| १५ | चेणागांव येथे नविन शाळागृह इमारत बांधणे | रु. २८,००,०००/- |
| १६ | प्रभाग क्र. १० मध्ये घोडबंदर रोडवर वर्सोवा जंक्शन व प्रेमसन्स कॉटेज जवळ कलवर्ट बांधणे. | रु. २०,००,०००/- |
| १७ | काशिमिरा येथे पोलिस स्टेशन जवळील स्मशानभूमी सुशोभित करणे. | रु. २०,००,०००/- |
| १८ | रा.म.क्र. ८ वर जनतानगर येथे सी.सी. पाथवे व चॅनल टाकणे. | रु. १३,००,०००/- |
| १९ | रा.म.क्र. ८ वर पेणकरपाडा येथे गावंड चाळ, वर्तक अळी, प्राथमिक शाळेचा परिसर, किसननगरी अंतर्गत सी.सी. पाथवे व लादी व पेव्हर ब्लॉक बसविणे. | रु. १९,९०,०००/- |
| २० | मिरा गांव येथे मार्केट, कर व आरोग्य कार्यालय बनविणे | रु. १३,५०,०००/- |
| २१ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या डाव्या बाजुस ते सिल्व्हर पार्क रस्त्यापर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ७१,५२,७१०/- |
| २२ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजुस जेम्मू काष्मीर बँक ते शांतीपार्क नाल्यापर्यंत गटार व स्लॅब टाकणे. | रु. ४०,९०,५४०/- |
| २३ | मिरारोड एम.टी.एन.एल. रस्त्याच्या उजव्या बाजुस निलसागर हॉटेल ते शांती पार्क नाला पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ५०,०६,८२०/- |
| २४ | मिरारोड रेल्वे उड्डाणपूल लोढा पार्क ते नरेंद्र पार्क पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे | रु. ७५,०३,९००/- |
| २५ | मिरा रोड चंद्रेश रिसोर्ट ते लोढा पार्क ते नरेंद्रपार्क पर्यंत रस्त्याच्या उजव्या बाजूस गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ६१,१२,४८०/- |
| २६ | मिरा रोड नरेंद्र पार्क ते शांती नगर से-१ रस्त्यापर्यंत डाव्या बाजूस नाला बांधून स्लॅब टाकणे. | रु. ३५,०४,१६०/- |
| २७ | मिरा रोड शांतीनगर शॉपींग सेंटर ते मच्छीमार्केट पर्यंत नाल्याची पूर्नबांधणी करुन स्लॅब टाकणे. | रु. ८७,०१,१५०/- |
| २८ | मिरारोड येथे शगुन हॉटेल ते सृष्टी नविन पोलिस चौकी पर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूस आर.सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रु. १,३५,६२,४९०/- |
| २९ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (काशिमिरा रोड) उड्डाणपूल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पर्यंत रस्ता रुंदीकरण, डांबरीकरण करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी. नाल्यासह फुटपाथ बांधणे.<br>मुळ अंदाजपत्रक<br>सुधारित अंदाजपत्रक | <br><br><br>रु. २७,४८,५४,९४१/-<br>रु. ३८,७७,८२,६३४/- |
| ३० | भाईंदर पूर्व व पश्चिम यांना जोडणारा रेल्वे वरील उड्डाणपूल व जोडरस्ते बांधणे.<br>मुळ अंदाजपत्रक<br>सुधारित अंदाजपत्रक | <br><br>रु. १६,५२,५१,५००/-<br>रु. २१,०७,००,०००/- |
| ३१ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर डाव्या बाजूस नाला बनविणे. | रु. ४०,१२,३००/- |
| ३२ | मिरारोड शांतीनगर से.४ पासून सृष्टी जूनाब्रिज पर्यंत गटार बांधणे (दोन्ही बाजुस) | रु. १,००,१८,४५०/- |
| ३३ | मिरारोड शिवपूजा इमा. ते जांगीड इस्टेट (हेरलपार्क) पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटार बांधणे. | रु. ४४,२५,२७०/- |
| ३४ | मिरारोड गौरव गॅलक्सी ते शगून हॉटेल पर्यंत आर.सी.सी. नाला बनविणे. | रु. ६२,९१,३७०/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ३५ | मिरारोड शांती नगर सर्कल ते एस.टी.पी. पर्यंत डाव्या बाजूस सी.सी. नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | रु. ४८,४२,५००/- |
| ३६ | मिरारोड ग्रीन व्ह्यू इमारत ते गौरव गॅलक्सी मध्ये रस्ता बनविणे व एका बाजुस गटार बनविणणे. | रु. ३६,७९,४००/- |
| ३७ | मिरारोड विजय पार्क येथे शिवपूजा इमारत ते रश्मी उत्सव पर्यंत रस्ता उंच करुन मजबूतीकरण करणे. | रु. ४७,२१,७५०/- |
| ३८ | मिरारोड लोढा पार्क ते रेल्वे ओव्हर ब्रिज जंक्शन पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे. | रु. ४८,५६,६८०/- |
| ३९ | मिरारोड येथे गितानगर ते सोनाली हॉटेल रोड पर्यंत गटार बांधणे | रु. २२,५७,७२५/- |
| ४० | मिरारोड येथे जांगीड सर्कल ते सृष्टी कडे जाणाऱ्या रोडवर आर.सी.सी. डिव्हायडर बसविणे. | रु. २७,९२,१२०/- |
| ४१ | मिरारोड येथे स्टेशन सर्कल ते साईल फराझ व शितलनगर जंक्शन ते सिंगापूर प्लाझा आर.सी.सी. डिव्हायडर बसविणे. | रु. १५,७०,५७०/- |
| ४२ | मिरारोड साईबाबा नगर येथे अरिहंत टॉवर ते वैभव दर्शन ते एम.टी.एन.एल. रस्त्यावर गटार दुरुस्ती करणे तसेच नविन गटार बांधणे. | रु. १२,७४,९००/- |
| ४३ | मिरा रोड पार्श्वनगर ते एन. एच. हायस्कूल पर्यंत गटार बांधणे. | रु. १४,०७,३५०/- |
| ४४ | मिरा रोड तुंगा हॉस्पीटल ते नर्मदा पॅराडाईज पर्यंत रस्ता रुंदीकरण व गटार बांधणे. | रु. १२,५१,१५०/- |
| ४५ | मिरा रोड चंद्रेश अभिषेक ते चंद्रेश महल रस्ता रुंदीकरण व मजबूतीकरण करणे. | रु. १४,९६,४९०/- |
| ४६ | मिरा रोड येथे एस. के. स्टोन ते उघाडीपर्यंत नाला बांधणे व रस्ता दुरुस्ती करणे. | रु. १३,७७,०६०/- |
| ४७ | शांतीनगर सेक्टर ११ पासून ते सिंगापूर प्लाझा पर्यंत रस्ता रुंद करणे व डीव्हायडर बसविणे. | रु. ५२,३६,९१०/- |
| ४८ | भाईंदर पूर्व जय अंबे इंडस्ट्रीयल इस्टेट मधिल अंतर्गत सी.सी. गटार व सी.सी. रस्ते करणे. | रु. १५,००,०००/- |
| ४९ | चौक धक्का येथे रॅम्प बनविणे | रु. ३०,००,०००/- |
| ५० | उत्तन पातान बंदर पॉलची वाडी, येथिल अंतर्गत रस्ते सी.सी. बनविणे. | रु. १५,००,०००/- |
| ५१ | पाली येथे मराठी शाळेपासून सुर्या निकेतन हॉस्पीटल पर्यंत रस्ता पूर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. २५,५०,०००/- |
| ५२ | मुर्धा येथिल स्मशानभूमी जवळील गार्डन विकसित करणे. | रु. १२,३०,०००/- |
| ५३ | मुर्धा खाडी येथे राम यादव यांच्या घराच्या बाजूला शौचालय बांधणे. | रु. २,५०,०००/- |
| ५४ | डोंगरी येथे घन कचरा प्रकल्पासाठी कंपाऊंड वॉल बांधणे. | रु. ९०,२०,०००/- |
| ५५ | भाईंदर (प) बुरहानी नगर ते चिंतामणी पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १८,२७,७००/- |
| ५६ | भाईंदर (प) क्रांतीनगर येथिल हनुमान मंदिर ते आरोग्य केंद्रापर्यंत नाला बांधणे. | रु. ५१,८६,७००/- |
| ५७ | भाईंदर (प) गितानगर येथिल भवानीपार्क ते कपोलवाडी पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ११,६८,१००/- |
| ५८ | भाईंदर (प) मांडली तलाव ते टेंभा हॉस्पीटल पर्यंतचा उर्वरीत डी.पी. रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे. | रु. २७,८४,७००/- |
| ५९ | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल ते रेल्वे उड्डाणपूल क्रॉस रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रु. १६,३९,५००/- |
| ६० | फाउंटन हॉटेल जंक्शन ते ठाणे जकात नाका येथिल रस्त्याच्या दुभाजक येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ७८,००,०००/- |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत येत आहे. अ.क्र. १०, ११ व १२ ची कामे महानगरपालिका निधितून करण्यात यावीत व दलित वस्ती सुधारण योजनेची निधी प्राप्त झाल्यावर

महानगरपालिका निधीत जमा करण्यात यावा. अ.क्र. १३ च्या कामी आमदार निधीतून निधी उपलब्ध होणार आहे. परंतू निधी उपलब्ध न झाल्यास उर्वरीत खर्च महानगरपालिकेच्या निधितून करण्यात यावा. अ.क्र. २९ व ३० चे काम वगळता इतर सर्व कामे मा. स्थायी समिती सभेपूढे ठेऊन प्राधान्य यादी ठरवून अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार निविदा मागविण्यांत याव्यात. तसेच या पुढे रु. ५०.० लक्ष पर्यंतच्या कामांना मा. स्थायी समिती सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात यावी. तसेच वरील कामांव्यतिरिक्त नगरसेवकांच्या प्रभागातील इतर कामांची अंदाजपत्रके तयार करून मा. स्थायी समितीपुढे सादर करावीत असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
५) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
६) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
७) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८) श्री. शेख आसिफ गुलाब
९) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१०) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११) श्री. नलावडे दिनेश द.
१२) श्री. पांडे हंसु कमलकुमार
१३) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१४) श्री. पाटील जयंत महादेव
१५) श्री. माळी रविंद्र भीमदेव
१६) श्री. घरत केशव रामभाऊ
१७) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१८) श्रीम. वाडे जिवी हिरा
१९) श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर
२०) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२१) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
२२) श्री. पटेल आसिफ गुलाम
२३) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२४) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२५) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२६) श्री. खान शफीक अहमद
२७) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२८) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२९) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
३०) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
३१) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
३२) श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
३३) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३४) श्री. मेहता नरेंद्र
३५) श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३६) श्री. पाटील मिलन गोविंदराव
३७) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
३८) श्री. पाटील रोहिदास आत्माराम
३९) श्री. शहा शशिकांत रतिलाल

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर
२) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
३) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
४) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
५) श्रीम. शाह रक्षा एस्.
६) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
७) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
८) श्रीम. शाह रिटा सुभाष
९) श्री. रतन कृष्णा पाटील
१०) श्री. पाटील अनंत रामचंद्र
११) श्रीम. शुभांगी सिताराम नाईक
१२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
१३) श्री. पाटील प्रफुल्ल काशीनाथ
१४) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
१५) श्रीम. पाटील लीला गुरुनाथ
१६) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१७) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
१८) श्री. मिलन वसंत म्हात्रे
१९) श्री. तिवारी सुरेन्द्रप्रसाद मुरलीधर
२०) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
२१) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन

(हजर मा. सदस्यांपैकी ठराव मतदानाच्यावेळी एकूण ०३ सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते.)

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ३९ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २१ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०० |
| एकूण सदस्य | :- | **६०** |

**सुचक :- श्री. महेंद्रसिंह चौहाण.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव बहूमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की या शहराचा विकास करायचा असेल त्यावेळी सर्व विचारवंतांचे म्हणजेच जे विचारवंत नगरसेवक आहेत. त्यांचे विचार घेतले जातात. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मला मघाशी तहयात सभापती पद दिले. आपण आपल्या आशिर्वादावर सभापती व्हायचे असेल तर जरुर होउ. परंतु, आपले आशीर्वाद मला कामाला येणार नाहीत. कारण आपण मघाशी ब-याच बाबतीमध्ये प्रशासनाच्या कामकाजावर बरीच टिकाटिपणी केली. मी जास्त बोलणार नाही. कारण माझी तब्येत आज अस्वस्थ आहे. तुमच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देणे मला जरुरी वाटणार नाही. परंतु, एकच सांगेन की जेव्हा सभागृह चालते तेव्हा माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटीलजी आपण एक कार्यकर्ते आहात. आपण एक चांगले संसदपट्टू आहात. नगरसेवक आहात. आपण चांगले काम केल्याची इच्छा प्रकट केली. परंतु, संसदेच्या कामकाजामध्ये लोकशाहीमध्ये बहुमत हे सर्वात मोठे हत्यार असु शकते. याची आपण नेमकी जाण विसरता. आपण या ठिकाणी वैचारिकता मांडली. परंतु, आपली वैचारिकता भाषणामध्ये गुंडाळून ठेवण्यात आली. हीसुध्दा बहुमतानेच गुंडाळून ठेवण्यात आली. आपली वैचारिकता नाही असे मला बोलायचे नाही. परंतु, आपल्याला जेव्हा जास्त बोलता येते, आपण जास्त बोलू इच्छितो. जरुर बोलावे. कारण लोकशाहीमध्ये कोणाला बोलण्याचा अधिकार नाही असे नाही. मी इथे बसुन पंतप्रधानांना बोलू शकतो. परंतु, आपण बोलण्याची जी पध्दत अवलंबता आपण ती

पध्दत अवलंबण्याचा जरुर विचार केला पाहिजे. आपण या शहराचा विकास करण्यासाठी एकत्र आलेले आहोत. परंतु, ज्यावेळी आपल्या हातामध्ये बहुमताचे शस्त्र होते. तेव्हा आपण विकासाचा प्रयत्न केला. आपण विकासही केला. तेव्हा आम्ही तुम्हाला टिका टिपणी केलेली नाही. परंतु, आपली वैचारिकता जरी चांगली असली आणि आपल्याकडे बहुमत नसेल तर अशा पध्दतीने आपल्याला भाष्य दाखविता येते. आपण हा विचार केला पाहिजे. मा. महापौर मॅडम, मला या ठिकाणी एवढेच बोलायचे आहे. बाकी कोणावर टिका टिपणी करण्याचा माझा आशय नाही. धन्यवाद.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, सर्व प्रभागातील नाल्याची कामे घेतली. माझ्या प्रभागातील नाला तुम्ही असा का ठेवलेला आहे? याची मला तुम्ही नोंद दया. माझ्या नाल्यावर सर्व भरणी करुन म्हणजेच नरेश शाहने भरणी केलेली आहे. तो नाला बंद ठेवून लोकांना बुडवायचे आहे का? तुम्ही मला हयाचे उत्तर दया. तो नाला का बंद केला? भरणी का केली? त्या बिल्डरला त्याची एन.ओ.सी. पास करुन देउ नये अशी मी तुम्हाला विनंती करते. आज पाच वर्षे झाली मी या नाल्यासाठी ओरडते. तरी माझा कोणीही विचार करित नाही. माझे पत्र तुम्ही कच-याच्या पेटीत टाकतात का? माझा हा नाला लवकरात लवकर करुन दयावा अशी मी तुम्हाला विनंती करते. पाच वर्षे झाली मी या नाल्यासाठी ओरडते परंतु कोणी लक्ष दिलेले नाही.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो की आता जो ठराव मंजुर करण्यात आलेला आहे. माझी अशी सुचना आहे की आयुक्तसाहेबांना माहिती आहे की गेल्या वर्षी आमच्या मिरा रोडमध्ये सर्व ठिकाणी पाणी भरलेले होते. त्याच्यामुळे नागरिकांचे कोटी रुपयाचे नुकसान झाले. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की आता जो ठराव मंजुर झाला. आमची जी प्राधान्याने कामे आहेत. प्रभाग क्र. १४ आणि प्रभाग क्र. १५ चे स्थानिक नगरसेवक जी कामे सुचवतील. ती कामे प्राधान्याने करण्यात यावीत अशी माझी विनंती आहे आणि काम पावसाळयाच्या अगोदर लवकरात लवकर होईल अशी मी विनंती करित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी मघाशी वक्तव्य केले की बहुमताच्या जोरावर सगळे करता येते.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, बारिश बहुत नजीक है । जल्दी से जल्दी काम चालू करना पडेगा । गुजरात मे बारिश चालू हो गयी है । तो अपने इधर जल्दी काम चालू करना पडेगा । मा. महापौर मॅडम आपभी मिरा रोड मे रहते है । मिरा रोड मे काफी पानी भरता है । थोडा ध्यान रखना पडेगा ।

**मिलन म्हात्रे :-**

आप नीचे बैठिये । मतदान किया विकास हो गया । अभी बोलने का अधिकार नही है । नीचे बैठो । विकास के लिए अभी मतदान किया है । अभी बोलने का नही। मतदान झालेले आहे. आपल्याला आता बोलायचा अधिकार नाही. विकास झालेला नाही असे तुम्ही बोलू शकत नाही. मतदान केलेले आहे. आता आम्हाला बोलू दया. मा. महापौर मॅडम मघाशी जे सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी वक्तव्य केले की सत्ताधा-यांनी स्वतःमध्ये कुठलाही माज आणू नये की आम्ही बहुमताच्या जोरावर बरेच काही करु शकतो. घंगाळे यांच्या मॅटरमध्ये आपले तोंड कुठे फुटले ते सर्वांना माहिती आहे. कळले का? तुम्ही सभागृहामध्ये बहुमताच्या मताने सर्व काही केले. दादागिरी केली. गुंडेशाही केली. परंतु, शेवटी तुमचेच मुख्यमंत्री, तुमचेच सगळे शासन चाललेले आहे. त्यांनी तुमच्या ठरावाच्या विरोधात निकाल दिलेला आहे. एवढे लक्षात घ्या.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

ऐसा कोई विरोध नही था । विरोध के बारेमे उनका सुझाव है । आयुक्त महोदय, यह एक सुझाव है की यह नाला बडा है । उसको काम मे शामिल किया जाए ।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एक ना दोन या अगोदर मागच्या सभागृहामध्येसुध्दा यांचाच पुढारी यांच्याच बहुमताच्या मस्तीमुळे जेलमध्ये गेला होता आणि नंतर तडीपार होउन डिस्क्वालिफाय झाला. हा या शहराचा इतिहास आहे. कसले आहे प्रथम नगराध्यक्ष. काही नाही. यांच्या मस्तीत ते सगळे भोगावे लागलेले आहे. त्यावेळेलाच ठरावसुध्दा बहुमताच्या जोरावर पास केला गेला होता. त्यावेळेला हयांचे हातपाय पोळलेले होते हे लक्षात घ्या. हयाची कामकाजामध्ये नोंद घ्यावी.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब, आपण फार ज्ञानी आहात. आपण ज्ञानाचे डोस पाजू नका. आपण या सभागृहामध्ये काय शब्द वापरतो काय नाही. हे बरोबर नाही. आपल्याला स्पष्टीकरण दयायची गरज नाही. आपण शांत बसावे. आपण कशाप्रकारे सभागृहात वर्तन करता. हे आपल्याला माहिती आहे का? वळवळ करता हे बरोबर आहे का? तुमच्यासारख्या सुज्ञ माणसाला हे शोभत नाही. तुम्ही खाली बसा. सचिव ठरावाचे वाचन करित आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मला सगळे माहिती आहे. हयांनी पहिली सुरुवात केली. ते जेव्हा बोलत होते. तेव्हा आपण बोललात. परंतु, मी उठून बोलत असताना मध्ये बोलू नका.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याकडे स्पष्टिकरण मागितलेले नाही. आपण खाली बसा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांलाही आम्ही सांगितले नाही रुलिंग द्या म्हणून.

**रोहित सुवर्णा :-**

मा. उपमहापौरसाहेब, तुम्ही मध्ये-मध्ये बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा. या ठिकाणी मेयर बसलेल्या आहेत. याच्यापुढे त्यांचे ऐकणार. तुमचे एकही रुलिंग ऐकणार नाही. तुम्हांला अधिकार नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम असताना सभागृहामध्ये उपमहापौरांनी बोलू नये.

**मा. उपमहापौर :-**

असा कायदा आहे का? कायदा कुठे आहे? मी डायसवर आहे. मी पीठासीन अधिकारी आहे.

**रोहित सुवर्णा :-**

तसा कायदा आहे. मा. महापौर रुलिंग देतील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही सांगा की मी अकार्यक्षम आहे. मा. उपमहापौर साहेब तुम्ही बोलायचे नाही. ते नियमात नाही. मा. महापौरांनी सांगावे की, मी निर्णय घ्यायला कार्यक्षम नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण खाली बसावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमनी सांगावे की, मी रुलिंग दयायला अकार्यक्षम आहे. मा. उपमहापौर साहेब तुम्ही रुलिंग दयायचे नाही हे लक्षात घ्या. याच्यापुढे तुम्ही उभे राहिलात तर आम्ही समजु की, महापौर मॅडम अकार्यक्षम आहेत हे तुम्ही लक्षात ठेवायचे आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम असताना मा. उपमहापौरांनी बोलू नये.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे माझ्या परवानगीने उपमहापौर बोलत आहेत. आपण शांत बसावे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम आपण बोलू शकतात.

**मा. महापौर :-**

मी बोलू शकते हे बरोबर आहे. परंतु, आपण खाली बसून घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम तुमच्या हयाला आमचा कसलाही अधिकार नाही. तुम्ही उपमहापौरांना उभे करायचे नाही. आम्ही यांना बोलू देणार नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है ।

**मिलन म्हात्रे :-**

हया ठरावामध्ये ज्या शेवटच्या दोन लाईन वाचल्या. त्याच्यामध्ये काय सांगितले.

**केशव घरत :-**

हयाच्यामध्ये जे लिहिलेले आहे. तेच मी वाचले.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यात स्थायी समितीचे काय आहे? हयाच्यामध्ये जे नाही. ते आपण वाचलेले आहे म्हणून सांगतो. सचिव तुम्ही ठरावाचे वाचन करायचे आहे. आम्हाला काय कळले नाही. स्थायी समिती रु. ५० लाख काय चाललेले आहे. ही महासभा अकार्यक्षम आहे का?

**प्र. सचिव :-**

माझ्याकडे ठराव आलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ठरावाचे वाचन करायचे आहे.

**प्र. सचिव :-**

त्यांनी ठराव वाचला आणि मी ठराव वाचला एक झाले.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव, प्रथम तुम्ही ठराव वाचला पाहिजे आणि नंतर सदस्यांकडे गेला पाहिजे. ही उलटी प्रथा कशी काय चालू आहे? आम्ही तुमची सगळी मजा बघत आहोत. खेळखंडोबा आहे का? ते प्रकरण नाही. मग तुम्ही प्रकरण वाचायला पाहिजे. तुम्ही तो ठराव वाचलेला नाही. अनुमोदन झालेले आहे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

यह ठराव है ।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बोलता की त्यांनी प्रकरण वाचले. अनुमोदक आणि सुचक झालेले आहे. म्हणजे काय?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

ठराव क्या है? यह बताईये ।

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण बरोबर बोलले ठराव काय आहे ते आम्हाला सांगा. म्हणजे आम्हाला मतदानाची मागणी करायची की नाही तो विचार करावा लागेल. जरा ठराव वाचून घ्या.

**प्रभात पाटील :-**

हे सभागृह आहे की दादागिरीची भाषा आहे. काय चाललेले आहे? कोण कोणाशी नीट बोलत नाही. सौजन्य नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील तुम्ही बसा. आम्हाला माहिती आहे.

**प्रभात पाटील :-**

बसा सांगू नका. हा प्रश्न तुम्ही विचारु शकता. परंतु, ही काय दादागिरीची भाषा आहे. ते अधिकारी आहेत. अशी कशी भाषा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

काय बरोबर आहे. मघाशी डायसवरुन अशीच भाषा वापरली. डायसवरुन केलेली भाषा कशी होती? चांगली होती का?

**प्रभात पाटील :-**

सचिव फक्त हसले. मला एवढेच म्हणायचे आहे की सभागृहाचे पावित्र्य राखा. मा. महापौर मॅडम, मी पुन्हा एकदा सांगते की आपण हयाच्याविषयी लक्ष दया. सदरचा स्टाफ हा आपला स्टाफ आहे. एखादा नगरसेवक आपला नगरसेवक आहे. इथे सौजन्यपूर्वक भाषा वापरली जावी.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही उगीच शिवीगाळ करित नाही. अरे-तुरे करित नाही. ही भाषा त्यांनी डायसवरुन वापरलेली आहे.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ८ करिता सुचक सन्मा. सदस्य केशव घरत आणि अनुमोदक सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांचा जो ठराव आलेला आहे. त्या ठरावाचे मी वाचन करतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०८ करिता सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी दिलेल्या ठरावाचे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

जो ठराव करण्यात आलेला आहे. तो ठराव बाकी सर्व व्यवस्थित आहे. परंतु, यापुढे रु. ५० लाखाच्या कामांची मंजुरी स्टँडिंगने दयावी हया विषयाशी याचा काही संबंध आहे का? तुम्ही खालच्या शेवटच्या दोन ओळी वाचा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०८ करिता सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी दिलेल्या ठरावाचे पुन्हा वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

वरील विकास कामे अत्यावश्यक सेवेतील असून सदर विकास कामांना ही महासभा आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी देउन पुढिल कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे. तसेच यापुढे रु. ५० लाख रक्कमेची कामे प्रशासकीय आणि आर्थिक मान्यतेकरिता स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावीत आणि मा. स्थायी समितीच्या मंजुरीनुसार पुढिल कार्यवाही करण्यात यावी असा ठराव पारित करण्यात येत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आजचा विषय हा जलवाहिनीला मंजुरी देण्यासाठी आहे. आम्ही मंजुरी देतो. परंतु, तुम्ही पुढे असे म्हटलेले आहे की पुढची सगळी रु. ५० लाखाची कामे ही स्टँडिंगपुढे पाठवायची. तर असा विषय आहे का? मग असा विषय महासभेपुढे घ्या की हयाच्यापुढची सगळी कामे रु. ५० लाख कशाला रु. २५ करोड दया. म्हणजे कामे फास्ट होतील. कारण स्टँडिंगच्या मिटिंगा प्रत्येक हप्त्याला होतात. भले त्या तीन ठेकेदारांची माणसे डायरेक्ट परमनन्ट करायला घेतलेली आहेत. तो वेगळा भाग आहे. परंतु, कामे तरी फास्ट होतील. हया नियमाशी त्याची काही सांगड आहे का? रु. ५० लाखाची कामे स्टँडिंग पुढे घ्यावीत हा विषय त्या विषयात तरी बसतो का? बाकीचे हे वगळून बाकीच्या विषयाला आमची मंजुरी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही रु. ५० लाखाची जी स्टँडिंगला पॉवर दिलेली आहे. तो विषय आम्ही मतदानाला टाकतो. रु. ५० लाखाचा जो स्टँडिंगचा विषय आहे. तो विषय मतदानाला टाकावा अशी आम्ही मागणी करतो. सचिवांनी मतदानाची तयारी सुरु करावी. स्थायी समितीला रु. ५० लाखाच्या पॉवर्स दयायला आमचा विरोध आहे. कारण हे सभागृह सक्षम आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण जशी पहिली मंजुरी दिली. तशीच मंजुरी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे तसेच आहे. या अगोदरच्या ठरावातसुध्दा तेच आहे. हयाच्यावर मतदान घ्या.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

लेकिन ठराव पिछले इसमे पास हो गया । अभी रु. ५० लाख का ठराव किधर है । ठराव ऑलरेडी पास हो गया है ।

**मिलन म्हात्रे :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु करा. गोषवा-यामध्ये ते नाही. मतदान सुरु करा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, तो विषय गोषवा-यामध्ये नाही. ठरावामध्ये दोन लाईन आणल्या गेल्या.

**मिलन म्हात्रे :-**

वरच्या ठरावाला आमचा विरोध नाही. उलट आम्ही अजून एक सांगतो की, त्याच्यामध्ये एक व्हेईकलची ॲड करावे. आपली कार्यशाळा नाही. ती हयाच्यामध्ये ॲड करावी. रु. ५० लाखाच्या मंजुरीला आमचा विरोध आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब, आपला विरोध नोंदवून घेण्यात येतो.

**मिलन म्हात्रे :-**

विरोध नाही. आम्ही सर्व नगरसेवकांनी मतदानाची मागणी केलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही ठराव मांडलेला आहे. ठराव पारित झालेला आहे. आपला विरोध नोंदवून घेण्यात येतो. सचिव, विरोध नोंदवून घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्हाला सभाशास्त्रानुसार मतदान घ्यावे लागेल. तुम्ही मेजोरिटीमध्ये पास करुन घ्या. आम्ही नाही बोललो नाही. तुम्ही कशाला घाबरता? स्टँडिंगला दया.

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब बोलले की रु. २५ करोडची तरतुद आहे. तुम्ही पॉवर दया. महासभा वर्षभर घेउ नका. सगळे स्थायी समितीला देउन टाका. तुम्ही मतदानाला सुरुवात करा.

**मा. महापौर :-**

सचिवांनी ठराव मतदानाला घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव बघा. व्यवस्थित वाचून घ्या. शेवटच्या ज्या दोन ओळी आहेत. तुमच्या मुळ प्रस्तावामध्ये नसलेल्या ओळी आहेत. त्याला आमचा विरोध आहे. आम्ही त्याला मतदानाची मागणी केलेली आहे. मुळ प्रस्ताव दिलेला आहे. त्याला आमचा विरोध नाही. फक्त रु. ५० लाखाच्या पॉवर्स स्थायी समितीला दिलेल्या आहेत. त्याला आमचा विरोध आहे. याच्या अगोदरच्या ठरावातसुध्दा तेच होते.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब, आपण ठराव मांडलेला नाही. ठराव पाठविलेला नाही. आपण फक्त मतदानाची मागणी करता. आपले मत आम्ही नोंदवून घेतलेले आहे. आपला विरोध आहे. परंतु, आपण अजूनपर्यंत ठराव पाठविलेला नाही. आपण ठराव पाठविल्याशिवाय मतदान कसे घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला ठराव पाठवायचा नाही. तुम्ही तुमचा जो ठराव आणलेला आहे. दोन ओळी ॲड केलेल्या आहेत. त्याला आमचा विरोध आहे. आम्ही त्याला मतदानाची मागणी केलेली आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा विरोध नोंदविलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मतदान घ्यायचे आहे.

**मा. उपमहापौर :-**

मतदान कसे घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

मतदान घ्या. तुमच्या गोषवा-यावर वस्तु नाही. चार सदस्यांनी मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्ही मतदान सुरु करा.

**मा. उपमहापौर :-**

आपण त्याला ठराव पाठवा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव कशाला पाठवायचा?

**मा. उपमहापौर :-**

मग मतदान कसे घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या मुळ प्रस्तावाला आमचा विरोध नाही. तुम्ही जे वाढवले स्टँडिंग कमिटीला ज्या पॉवर्स दिलेल्या आहेत. त्याला आमचा विरोध आहे. तो पाठवायची गरज नाही.

**मा. उपमहापौर :-**

मग आम्ही कशावर मतदान घ्यायचे?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मुळ प्रस्ताव पास करा.

**मा. उपमहापौर :-**

व्हॅबली मतदान कसे होणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मुळ प्रस्ताव पास करा.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही प्रस्ताव पाठवा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मतदान घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपमहापौरसाहेब, ते विषयामध्ये प्रस्ताव नाही तर मग तुम्ही हयाच्यामध्ये ॲड कसे केले?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही हयाच्या व्यतिरिक्त मंजुरी देत नाही.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही मतदान घेतो. परंतु, तुम्ही तुमचा ठराव पाठवा.

**रतन पाटील :-**

संबंधित कामाला आमचा विरोध नाही. परंतु, ज्या दोन ओळी आहेत. त्या काढून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे कुठे ॲड केले.

**मा. उपमहापौर :-**

परंतु, हे कसे घेता येईल? आम्ही ठरावावर उपसुचना केलेली आहे. मुळ ठरावावर उपसुचना देउन जो ठराव आलेला आहे तो ठराव पारित झालेला आहे. तुमचा ठराव दया. दुसरा ठराव नाही. मग मतदान कसे घेता येईल. तुमचे मत आम्ही विरोधात नोंदवून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

सचिवसाहेब, आम्ही चार सदस्यांनी मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्ही मतदानाला सुरुवात करा.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

ठराव ऑलरडी पास हो चुका है । इनका विरोध नोट किया गया है ।

**मिलन म्हात्रे :-**

आपके कहनेसे होता नही है । वह नियम है । चार लोगोने माँग किया खतम हो गया । मतदान लिजिए ।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आपका ठराव किधर है? रु. ५० लाख का ठराव ऑलरेडी पास हो चुका है । आपका विरोध होगा तो वह नोट किया जाता है ।

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्तसाहेब, आपण काय ते सांगा. जे नियमात आहे ते आपण का बोलत नाही. आपण गप्प का बसलेले आहात. आम्हाला आयुक्तसाहेब काय बोलतात ते समजले पाहिजे.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

अभी नियम मे ऑलरेडी पास किया है । आपका विरोध है ।

**मिलन म्हात्रे :-**

मतदानाला सुरुवात करा.

**रतन पाटील :-**

बहुमताने असेल तर बहुमताने दाखवा. आम्ही विरोधात बोलतो. बहुमत दाखवा आणि प्रस्ताव मतदानाला टाका. आम्ही नाही कुठे बोलतो?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आपका विरोध नोट किया है । हर चीज के विकास मे आपका विरोध होता है । सचिवजी इनका विरोध ऑलरेडी नोट है । तो इनको बताईये ।

**रतन पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब हे बरोबर आहे का? याला अशी परवानगी देता का?

**मा. उपमहापौर :-**

हे बघा. आपण ठराव पाठविलेला नाही. आपण ठराव पाठवा.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्तसाहेब काय बोलतात. ते त्यांना बोलू दया.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

आपकी सुचना है । मगर आपका ठराव किधर है?

**रतन पाटील :-**

यह बराबर है या बराबर नही है यह आयुक्तसाहब बतायेंगे।

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इनका विरोध लिखिए।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता जो ठराव झाला. त्याच्यामध्ये शेवटच्या दोन ओळी आहेत की रु. ५० लाखच्या पॉवर्स स्टँडिंगला दयाव्यात. मग हयाच्यामध्ये वाद निर्माण झाला आणि मतदान घ्या अशी मागणी झालेली आहे. साहेब, हा प्रशासनाचा विषय आहे. आपण जवाब दयायला पाहिजे की असे रु.

५० लाख वाढवायचे महापौरांना अधिकार आहेत की नाहीत. त्याच्यावर सर्व अवलंबुन आहे. त्यांना अधिकार असेल तर ते करु शकतात.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्तसाहेब, आपण जवाब दया.

**रिटा शाह :-**

मा. आयुक्तसाहेब, आपण प्रशासनातर्फे जवाब दया. स्टँडिंग समिती आणि महासभेला आपल्या महाराष्ट्र गव्हर्नमेन्टच्या जी.आर. च्या अंर्तगत त्यांना किती पॉवर्स आहेत मला या ठिकाणी असे वाटते की आपल्या कायदयामध्ये त्याच्यासाठी काहीतरी तरतुद आहे. त्याच्या व्यतिरिक्त रु. ५० लाख वाढवायचे अशा पॉवर्स महापौरांना आहेत का? जर अशा पॉवर्स असतील तर वाढवायला आमची काहीही हरकत नाही. परंतु, त्यांना वाढवून घ्यायच्या पॉवर्स आहेत का?

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण......

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख मै आपका रिस्पेक्ट करती हूँ । मैने एक सवाल पुछा है । आप डिसीप्लिन की बाते करते है और आप बीच मे खडे हो जाते है । ऐसे मत किजिए । उनको जवाब देने दिजिए ।

**आसिफ शेख :-**

मा. महापौरजीने इशारा किया।

**रिटा शाह :-**

सभागृहमे इशारे की भाषा नही चलती है। आप बैठिये।

**आसिफ शेख :-**

मुझे बोलने दिजिए । हमने आपको रोका नही है । आप कैसे रोक रहे है ।

**रिटा शाह :-**

मै रोक नही रही हूँ । मेरा सवाल है । इसलिए मै खडी हूँ । आप बैठिये ।

**आसिफ शेख :-**

आपका सवाल हो गया है । उसके बाद हमने सवाल किया है ।

**रिटा शाह :-**

मेरे सवाल का जवाब नही मिला है । मै जवाब के लिए खडी हूँ।

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्तसाहेब, आपण खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

कायदयातील तरतुदीच्या संदर्भात मला कायदे तज्ञाचेच मत घ्यावे लागेल. हया पॉवर्स डेलिकेट आहेत का? देता येतात का? त्याच्या विषयी मी असे ऑफहॅन्ड सांगू शकत नाही. कायदयामध्ये आयुक्तांना रु. १० लाखापर्यंत पॉवर्स आहेत. जर रु. १० लाखाच्यावर प्रस्ताव असेल तर तो सध्याच्या प्रचलित नियमानुसार महासभेपुढे येतो आणि त्याला प्रशासकीय आणि आर्थिक मान्यता मिळाल्यानंतर संविधा करण्यासाठी हे प्रकरण स्थायी समितीपुढे जाते. हा आतापर्यंत एक परिपाठ किंवा प्रथा आहे. परंतु, कामे जलद गतीने व्हावीत. महासभा महिन्याला फक्त एकदाच भरते आणि स्थायी समितीचे आयोजन आठवडयातून एकदा होते. तर काही महत्वाची कामे जी रु. १० लाखाच्या वरची आणि तातडीची असतील अशा कामांसाठी अशा पॉवर्स स्थायी समितीला देण्याचे हयाच्यामध्ये काही गैर आहे असे मला वाटत नाही. मी प्रशासकीय दृष्टिने बोलतो. परंतु, त्याबाबत नवी मुंबई महापालिकेनेदेखील अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे असे मला माझ्या अधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. नक्की डेलिकेट सेक्शन कोणती आहेत. त्याबद्दल मला तज्ञाशी सल्लामसलत करुनच आपल्याला सांगता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

चार सदस्यांनी मतदानाची मागणी केलेली आहे. त्याचे बोला. आम्ही मागणी केलेली आहे. ठराव मतदानाला घ्या. मी ठराव पाठवतो.

**धनराज अग्रवाल :-**

आयुक्तसाहेब, आपण आता सांगितले की फार महत्वाचे काम असेल तर आपण मान्यता देतो. परंतु, या ठिकाणी आपली जी कामे येतात. एक-एक करोडचे काम डिव्हाईड करुन दहा-दहा लाखामध्ये कामे येतात. जर आवश्यक नसेल तरी रु. १०-१० लाखाची कामे येतात. मग हयाची काय

आवश्यकता आहे. मग २० लाखाची काय आवश्यकता आहे? हे तुम्ही मला सांगा. साहेब, आपण एक-एक करोडचे काम एका टाईमाला घेतलेले आहे. पार्ट-पार्ट करुन घेतलेले आहे. मग तिकडे रु. २० लाखाची काय आवश्यकता आहे.

**रतन पाटील :-**

एकच प्रोजेक्ट आहे. एकाच कामाचे दहा-दहा तुकडे केलेले आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, हे बरोबर नाही. हयाच्यामध्ये हा विषय नसताना ॲड केले हे बरोबर नाही. याला आमचासुध्दा विरोध आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पीठासीन अधिकारी, आपल्याला एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो की मघाशी सन्मा. सभापती मोहन पाटील यांनी सांगितले की बहुमताच्या जोरावर काहीही करता येते. ते खरे आहे. आपण बहुमताच्या जोरावर जी काही चांगली कामे असतील ती सगळी कामे करुया. आपल्याला एक गोष्ट सांगतो की कुठल्याही आर्थिक आणि प्रशासकीय मंजु-या ज्या आहेत. हया सगळया मंजु-या या महासभेने दयायच्या असतात. महासभा अशा पॉवर्स डेलिगेट करु शकत नाही. कारण त्या आर्थिक बाबतीमध्ये आहेत. आर्थिक बाब सोडून कुठल्याही पॉवर्स ही महासभा स्टँडिंगला किंवा महासभेने जर एखादी समिती गठित केली असेल तर त्याला कुठल्याही पॉवर्स डेलिगेट करु शकतात. परंतु, आर्थिक पॉवर्स डेलिगेट करु शकत नाही. आपण जर अशाप्रकारचा प्रयास केला तर मला वाटते की तो कायदयाच्या विरोधात असेल. त्याच्यापेक्षा त्याचे मत आज मागवून घ्या आणि त्याच्यानंतर असा ठराव आणा. आजच्या ठरावामध्ये तुम्हाला एवढी घाई करण्याची गरज नाही. हा माझा मित्रत्वाचा सल्ला आहे. अदरवाईस तुम्ही आमचा ठराव मतदानाला ठेवा.

**रिटा शाह :-**

साहेब, मी आता एक प्रश्न विचारला आपण आता सांगितले की मी कायदयाच्या तज्ञांना विचारेन. महापौरांना एकटयांना पॉवर्स नाहीत. ते आपण बघतो. परंतु, कुठल्याही कमिटीला किती वाढवून घ्यायचे हया पॉवर्स सभागृहाला आहेत का? मघाशी सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले की लोकशाही पध्दतीने आणि मेजोरिटीच्या पध्दतीने आपण काहीही करु शकतो. सन्मा. सदस्या रिटा शाह जेव्हा सभागृहात उभी राहते तेव्हा मी पक्ष बघून उभी राहत नाही. मी जे खरे असेल तेव्हाच उठते आणि मला जेवढे काही खरे वाटत असेल तेवढेच मी नेहमी बोलत असते. तर महापौरांना एकटयांना नक्कीच तो अधिकार नाही. सभागृहाला काय अधिकार आहेत का की महासभेला किंवा स्थायी समिती किंवा महिला व बालकल्याण समिती किंवा इतर समितीना किती बजेट दयावे आणि वाढवून घेण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला आहे का? दुसरी गोष्टी अशी आहे की जेव्हा लोकशाहीचा आणि मेजोरिटीचा मुद्दा उठला तेव्हा आम्ही सर्व सभागृहामध्ये सर्व सभासदांनी, महापौर आणि उपमहापौरांचा मानसन्मान राखून आम्ही मेजोरिटीने काही जागांवर मतदान केलेले आहे. आम्ही घंगाळेंच्या विषयामध्ये कॉंग्रेसचे २७ नगरसेवक होते. मी मतदान केले नाही कारण मला ते बरे वाटले नाही. मला तो विषय चुकीचा वाटला म्हणून मी त्याच्या विरोधात मतदान केले. आपण लोकशाही पध्दतीने, मेजोरिटीने मतदान घेउन पक्षाचा आदेश म्हणून आपण करुन घेतो. शेवटी आमच्याच पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी तो ठराव रद्द केलेला आहे. म्हणजे लोकशाही आणि मेजोरिटीने असा गैरफायदा करुन घ्यायचा नाही. आपण ही एक आठवण ठेवायला पाहिजे. कारण हे सभागृह मिरा भाईंदर क्षेत्राच्या विकासासाठी आपण बनविलेले आहे. साहेब, माझा प्रश्न असा आहे की सभागृहाला अधिकार आहेत का? स्टँडिंग कमिटीचे बजेट वाढवायचा सभागृहाचा अधिकार आहे का? सभागृहात बसलेल्या नगरसेवकांनी म्हणजे आम्ही बहुमताने जे पास करुन दिले.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला त्याच्याबद्दलच सांगितले की या महासभेला अशा आर्थिक पॉवर्स स्थायी समितीला डेलिगेट करता येतील का? या संबंधी सांगू इच्छितो की हा विषय अचानक आलेला आहे. हा ठरावाच्या शेवटी ॲड केलेला आहे. त्यामुळे मी जोपर्यंत कायदयाचा सल्ला घेत नाही. तोपर्यंत मला सांगता येणार नाही. दुसरा विषय जो घंगाळेच्या बाबतीमध्ये आलेला आहे.............

**रिटा शाह :-**

साहेब, मी कोणाचा विषय काढत नाही. बहुमताचा आणि मेजोरिटीचा जो प्रश्न लोकशाही पध्दतीत आहे. मग आपण चांगली कामेसुध्दा बहुमताने करतो. आपण वाईट कामेसुध्दा बहुमताने करुन घेतो. साहेब, शेवटी त्याचा काय रिझल्ट आहे?

**मा. आयुक्त :-**

मी त्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की हे शासनाचे परिपत्रक होते. त्यानुसार या महासभेने फक्त ठराव केलेला होता.

**रिटा शाह :-**

मी प्रशासनाच्याबद्दल आणि तुमच्याबद्दल बोलत नाही. शेवटी आम्हाला जो आदेश मिळतो. आम्हाला जे खरे वाटते त्या हिशोबाने आम्ही मतदान करतो. परंतु, कधी-कधी आमच्याकडून चुकीने बहुमत घेतले जाते. आपल्याला जेव्हा कायदयाची माहितीच नाही. कुठल्याही कमिटीला किती वाढवून दयायचे हा अधिकार आपल्याकडे आहे का? हे आपल्याला माहितीच नाही तर आपण त्याच्यावर कसे रुलिंग देणार आणि तो ठराव कसा घेणार. तो ठराव कसा पास करुन घेणार?

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिल्या ठरावाचे सुचक सन्मा. सदस्य केशव घरत आणि अनुमोदक सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी आहेत. दुसरा जो ठराव आहे त्याचे सुचक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि अनुमोदक सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आहेत. मी नियमानुसार दुसरा ठराव पहिल्यांदा मतास टाकतो.

**रिटा शाह :-**

आपण मतदान घेता. माझा प्रश्न होता की, महापौरांना किंवा सभागृहाला अधिकार आहेत का? जोपर्यंत आपल्याला कायदयाची बाब समजणार नाही. तोपर्यंत तुम्ही त्याच्यावर कसे काय मतदान घेणार?

**प्र. सचिव :-**

ठराव आलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तो ठरावसुध्दा पास होणार नाही. तुम्ही तो यस कसा काय बोलणार? हे शस्त्र दुधारी आहे. जर हा ठराव पास होत नसेल तर तो ठरावसुध्दा पास होणार नाही हे लक्षात ठेवा. शब्दाचे खेळ खेळू नका.

**रिटा शाह :-**

सभागृहाला अधिकार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

न्यायविधीवाले हे बघा. आपण रु. ११,०००/- ते रु. १३,५००/- महिन्याला पेमेन्ट देतो. ती गाडी कुठे-कुठे फिरते? तो अधिकारी कुठे आहे? त्याला सभागृहामध्ये बोलावून घ्या. पैशाचा काय खेळखंडोबा चाललेला आहे का? आम्ही लोक अर्धा तास बसलेले आहोत आणि मतदानाची मागणी केलेली आहे. त्या सदस्यांची नोंद करुन घ्या. किती सदस्यांनी मतदानाची मागणी केली ती नोंद करुन घ्या. त्या मतदानाची विषयपत्रिका नंतर सुरु करा. त्यांची नावे वाचा.

**रिटा शाह :-**

मतदान घ्या. आमचा दुराग्रह नाही. परंतु, आपण मतदान घेण्यापूर्वी क्लिअर करा की सभागृह किंवा महापौरांना हयाचे अधिकार आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

निधी किंवा विधी.

**रिटा शाह :-**

अधिकार है या नही है वह डिक्लेअर करने दिजिए। हमारा अधिकार है तो हम लोग मतदान करेंगे। हमारा अधिकारही नही है तो मतदान करने का सवाल किधर आता है।

**मा. उपमहापौर :-**

महानगरपालिकेची महासभा आणि या महासभेमध्ये पारित झालेला जो ठराव आहे. तो एक कायदा असतो. तो कायदा करण्याची शक्ती हया महासभेला आहे. महासभेत निर्णय झाला तर तो काय चुकीचा होईल असा कोणालाही गैरसमज करुन घ्यायची गरज नाही. आता ठराव मांडलेला आहे. सचिवांनी त्याच्यावर मतदान घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, उल्हासनगर महापालिकेला महासभेने साडे-आठ करोड रुपयाच्या हाउस टॅक्सबद्दलचा असा ठराव पास केलेला होता. तो वरती सेटअसाड झाला. महासभेने कुठलाही चुकीचा निर्णय घेउ नये. आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. तुम्ही मतदान घ्या. आमची नावे नोट करा.

सहा जणांनी किंवा आठ जणांनी मागणी केलेली आहे. मतदान घ्या. विषय संपवून टाका. तुम्ही श्रेष्ठ आहात, ज्येष्ठ आहात.

**प्र. सचिव :-**

दुसऱ्या ठरावाचे वाचन करुन मी तो ठराव मतदानाला टाकतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०८ करिता सन्मा. सदस्य श्री. मिलन व. म्हात्रे ह्यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०८ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (पाणी पुरवठा)

**ठराव :-**

प्रकरण क्र. ८ मधिल मुळ गोषवाऱ्यामध्ये मा. स्थायी समितीस यापुढे ५० लाख या रक्कमाच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी दिल्याने मा. महासभेचे हक्क डावले जात असल्या कारणाने मा. स्थायी समिती पुढील काही विषय मा. स्थायी समितीने त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचे असल्याने मा. महासभेपुढे निर्णयाकरिता पाठविल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्याकरिता या प्रकरणी मा. स्थायी समितीला यापुढे ५० लाख इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास मा. स्थायी समितीकडे न देता मा. महासभेच्या अधिकारात असलेले सर्व प्रकरणे मा. महासभां व्यक्तीरिक्त अन्य कोणाकडेही निर्णय घेण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी करीता पाठविण्यांत येऊ नये असा मी ठराव मांडत आहे.

**प्र. सचिव :-**

या ठरावाचे सुचक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि अनुमोदक सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. म्हात्रे मिलन वसंत
४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
११) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१२) श्री. पाटील रतन कृष्णा
१३) श्री. पाटील शरद केशव
१४) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१५) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१६) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
१७) श्रीम. शाह रक्षा एस.
१८) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१९) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
२१) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
२२) श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस

ठरावाच्या बाजूने एकुण २२ सदस्य आहेत. या ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
४) श्रीम. सपार उमा विश्वनाथ

५)	श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
६)	श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
७)	श्री. शेख आसिफ गुलाब
८)	श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
९)	श्री. नलावडे दिनेश द.
१०)	श्री. पांडे हंसु कमलकुमार
११)	श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२)	श्री. माळी रविंद्र भीमदेव
१३)	श्री. घरत केशव रामभाऊ
१४)	श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५)	श्रीम. वाडे जिवी हिरा
१६)	श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१७)	श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
१८)	श्री. पटेल आसिफ गुलाम
१९)	श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२०)	श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२१)	श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२२)	श्री. खान शफीक अहमद
२३)	श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४)	श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२५)	श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२६)	श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२७)	श्रीम. भामरे उर्मिला कोमल
२८)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
२९)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३०)	श्री. मेहता नरेंद्र
३१)	श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३२)	श्री. पाटील मिलन गोविंदराव
३३)	श्री. पाटील रोहिदास आत्माराम

ठरावाच्या विरोधात ३३ सदस्य आहेत.

**रिटा शाह :-**

कमिशनरसाहेब मी दोन प्रश्न विचारलेले होते की महापौरांना पॉवर्स आहेत का? तुम्ही काय बोलले की आपल्याकडे कायदयाचे तज्ञ नाहीत. म्हणून मला ते माहिती नाही. आपण मला असे उत्तर दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तसे उत्तर दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

मग मी तेच सांगते. तुमचा काहीही विरोध करित नाही. कारण असा विषय मतदानाला झालेला आहे की रु. ५० लाखाच्या पॉवर्स स्टँडिंग कमिटीला देण्यासाठी माझा काहीही विरोध नाही. मी फक्त एवढेच विचारले होते की स्टँडिंग कमिटीला रु. ५० लाख दयायच्या पॉवर्स सभागृहाला किंवा महापौरांना आहेत का? तर मी मतदान करते. आम्हाला पॉवर्स नसेल तर मतदान करायचा प्रश्नच कुठे येतो? असे नाही. मला कायदेशीर जवाब दया. मी पुन्हा आहे-आहे करुन रु. ५० लाख नाही. मी रु. ५० करोड वाढवून देते. आम्हाला अधिकार आहेत की नाही ते प्रथम सांगा. कायदेशीर असेल तर माझे मतदान त्या बाजुला आहे. मला फक्त जवाब दया की तुम्हाला याबाबत काही कायदेशीर बाबी ठरविलेल्या आहेत ते माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

मला वाटते की मी याचा भरपूर खुलासा केलेला आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मला असे वाटते की तुम्ही जास्त समजतात आणि मी कमी समजते असे समजून मला जवाब दया.

**मा. आयुक्त :-**

रु. १० लाखापर्यंतच्या खर्चाला मंजुरी देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत.

**रिटा शाह :-**

मी ते सांगत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी तेच सांगतो दुसरे काही सांगत नाही. रु. १० लाखाच्या वरची जी प्रकरणे आहेत. ती प्रकरणे सध्या महासभेपुढे येतात. परंतु, मी जसे म्हटले की इतर महापालिकेनेसुध्दा काही पॉवर्स डेलिकेट केलेल्या आहेत. परंतु, त्याच्या संदर्भातील जी कायदेशीर बाब आहे. ती बाब तपासून घ्यावी लागेल. मी आज का उत्तर देउ शकत नाही. त्याचेसुध्दा कारण सांगतो की हा मुद्दा अचानक आलेला आहे. त्याच्या कायदेशीर बाबी तपासूनच मला या सभागृहापुढे निवेदन करावे लागेल. कारण मी अचानक कुठल्यातरी कलमाचा आधार घेउन सांगणे योग्य होणार नाही.

**रिटा शाह :-**

मी तेच सांगते. एग्झॅक्टली यु आर राईट सर.

**मा. आयुक्त :-**

दुसरी गोष्ट अशी आहे की जर आपला ठराव तसा झाला असेल. समजा आज तसा ठराव होईल. तरीदेखील मला त्याची कायदेशीर बाजू तपासता येईल. म्हणजे आज ठराव झाला की त्याची अंमलबजावणी लगेच सुरु होईल असे काही नाही. आपण त्याच्यातील कायदेशीर बाबी ठराव झाल्यानंतरसुध्दा तपासु शकतो.

**रिटा शाह :-**

आम्ही आपल्याला नेहमी ठराव करुन देतो.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त महाशय, तुमचे जे लिगल ओपीनियन येईपर्यंत उदया हयांनी मंजुर केलेल्या ठरावाचे तुम्ही पालन करणार का? त्याची कार्यवाही उदयापासून सुरु होणार की नाही. एवढेच सांगा. कारण स्टँडिंगला लगेच रु. ५-२५ लाखाचे विषय येतील.

**मा. आयुक्त :-**

मी कायदेशीर बाब तपासून घेतल्यानंतर त्याची कार्यवाही करिन.

**रिटा शाह :-**

मग मी त्याच्या बाजूला आहे. रु. ५० लाख काय रु. ५० करोड करुन घ्या. आम्हाला त्याचे काय आहे.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण कुठल्या बाजूने आहात. ठरावाच्या बाजूने आहात की ठरावाच्या विरोधात आहात.

**रिटा शाह :-**

मी फक्त दोन प्रश्न विचारलेले आहेत की महापौर आणि स्थायी समितीला पॉवर्स आहेत का? कायदेशीर बाब बघून म्हणजे तोपर्यंत ते जवाब देउ शकत नाही असे आयुक्तसाहबांनी मला उत्तर दिलेले आहे. कायदेशीर बाब अशी आली की तसे होउ शकत नाही. म्हणजे तो ठराव कॅन्सल झाला. तो ठराव होउ शकत नाही. म्हणजे त्याच्यावर इम्प्लिमेन्टेशन होउ शकत नाही. मग माझे असे मत आहे की कायदेशीर बाबीमध्ये तो ठराव मंजुर होउ शकतो. तर मी रु. ५० लाखाची मंजुरी स्थायी समितीला दयायची हया बाजूने आहे. परंतु, कायदेशीर बाजू अशी असेल की तो ठराव आम्ही करु शकत नाही तर मी ठरावाच्या विरोधात आहे. हे माझे मत आहे. त्याचा अर्थ मी तटस्थ आहे.

**प्र. सचिव :-**

पहिल्या ठरावाचे वाचन मघाशी झालेले आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०८ करिता सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०८ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (पाणी पुरवठा)

**ठराव :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात स्टेम प्राधिकरणाकडून प्रतिदिन ८१ दललि मंजुर कोटयातून पाणी पुरवठा होत आहे. महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार ५० दललि पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेतील उपांगांची कामे चालू आहेत. सदरच्या उपांगास पुरक व नागरीकांना पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करणेसाठी सक्षम वितरण व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच ग्रामपंचायत काळात शहरामध्ये त्यावेळच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार विविध व्यासाच्या सिमेंटच्या जलवाहिन्या टाकणेत आल्या होत्या. सदरच्या सिमेंटच्या जलवाहिन्या नवीन पाणी पुरवठा योजना अंशत: कार्यान्वित झाल्यावर पाण्याच्या दाबास टिकत नसल्याने वारंवार गळती होत आहेत. परिणामी नागरीकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. म्हणून सदरच्या जलवाहिन्या आताच्या लोकसंख्येच्या मानाने व सद्यस्थितीतील पाण्याचा दाब विचारात घेऊन बदलणे आवश्यक आहे. करिता महानगरपालिका क्षेत्रात आवश्यक ठिकाणी जलवाहिन्या टाकणेसाठी व अस्तित्वातील सिमेंटच्या जलवाहिन्या बदलणेसाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन ०४-०५ सालातील चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत. सदर अंदाजपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार झडपा, जोड साहित्य (मेकॅनिकल फिटींग), खोदाई, पाईप पुरवठा करून अंथरणे, जोडणे व यशस्वी दाबचाचणी देणे इ. बाबींचा समावेश करणेत आला आहे. तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील विविध जलवाहिनीतील पाण्याचा दाब समान राहण्यासाठी अस्तित्वातील जलवाहिन्यांना क्रॉस कनेक्शन करणेचाही प्रामुख्याने समावेश केला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भाईदर पश्चिम राई शिवनेरी येथे वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिनी अंथरणे | १००<br>१५०<br>२०० | १३७५<br>४००<br>२० | २८२१२००.०० |
| २ | भाईदर पश्चिम उत्तन पाली गाव येथे वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १००<br>१५० | १०००<br>५० | १४०९१००.०० |
| ३ | भाईदर पश्चिम उत्तन गाव येथे वितरण वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १०० | १००० | ११८४०००.०० |
| ४ | भाईदर पश्चिम येथील गीता नगर ते गणेश मंदीर येथे जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५० | ७०० | ११५००००.०० |
| ५ | भाईदर पश्चिम येथील टेंभा रोड ते रेल्वे ओव्हर ब्रिज पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५०<br>२०० | ४५०<br>९०० | २५३४१६०.०० |
| ६ | भाईदर पश्चिम येथे गणेश देवल नगर येथे नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ८०<br>१००<br>१५० | १०००<br>५००<br>२५० | १८५००००.०० |
| ७ | मिरा रोड येथे विजय पार्क परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २००<br>२५० | २००<br>३०० | १२०५४२५.०० |
| ८ | मिरा रोड हटकेश परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २५०<br>२०० | ८२०<br>२५० | ३१३८४००.०० |
| ९ | मिरा रोड (काशी) नित्यानंद नगर मध्ये बिडाची जलवाहिनी अंथरणे | २०० | ९०० | १६९२७३८.०० |
| १० | मिरा रोड परिसरात मिरा पंपींग स्टेशन ते एम.आय.डी.सी. सम्प पर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे | ३०० | ५५० | १८७८३३१.०० |
| ११ | भाईदर पुर्व परिसरात गोडदेव टाकी साईकृपा कॉम्पलेक्स ते गोडदेव स्मशान भुमी रोड पर्यंत बिडाची जलवाहिन्या अंथरणे. | ४००(M.S.)<br>४००<br>३५० | १२०<br>२३०<br>२५० | ३०९००५०.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १२ | मिरा रोड विभागात शितल नगरपरिसरात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>२५० | ५००<br>५००<br>१५० | १६३५९५०.०० |
| १३ | मिरा रोड शांती विद्या नगरी परिसराकरीता विभागात बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ३००<br>२५० | ७५०<br>८२० | ४५७१७००.०० |
| १४ | काशी गावामध्ये जुन्या सिमेंटच्या जलवाहिन्या बदलून नवीन बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>३०० | १०००<br>३००<br>२०० | २१५८७३५.०० |
| १५ | मिरा रोड येथे शांती पार्क विभागात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | २००<br>२५०<br>३०० | २००<br>५५०<br>४०० | ३०९०७१५.०० |

वरील विकास कामे अत्यावश्यक सेवेतील असून सदर विकास कामांना ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे. तसेच यापुढे रू.५०.०० लक्ष रकमेपर्यतची कामे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात यावीत व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसारच पुढील कार्यवाही करणेत यावी. असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**प्र. सचिव :-**

सुचक सन्मा. सदस्य केशव घरत आणि अनुमोदक सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांच्या ठरावाच्या बाजूने जे सदस्य आहेत. त्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
४) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
५) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
६) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
७) श्री. शेख आसिफ गुलाब
८) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
९) श्री. नलावडे दिनेश द.
१०) श्री. पांडे हंसु कमलकुमार
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. माळी रविंद्र भीमदेव
१३) श्री. घरत केशव रामभाऊ
१४) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५) श्रीम. वाडे जिवी हिरा
१६) श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१७) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
१८) श्री. पटेल आसिफ गुलाम
१९) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२०) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२१) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२२) श्री. खान शफीक अहमद
२३) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२५) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट

२६)	श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२७)	श्रीम. भामरे उर्मिला कोमल
२८)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
२९)	श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३०)	श्री. मेहता नरेंद्र
३१)	श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३२)	श्री. पाटील मिलन गोविंदराव
३३)	श्री. पाटील रोहिदास आत्माराम

ठरावाच्या बाजूने ३३ सदस्य आहे.  या ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१)	श्री. पाटील अनंत रामचंद्र
२)	श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३)	श्री. म्हात्रे मिलन वसंत
४)	श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५)	श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६)	श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७)	श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
११)	श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१२)	श्री. पाटील रतन कृष्णा
१३)	श्री. पाटील शरद केशव
१४)	श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१५)	श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१६)	श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
१७)	श्रीम. शाह रक्षा एस.
१८)	श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१९)	श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२०)	श्री. भोईर गजानन लक्ष्मण
२१)	श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
२२)	श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस

**ठरावाच्या वेळी तटस्थ असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१)	श्रीम. रिटा सुभाष शाह

ठरावाच्या विरोधात एकूण २२ सदस्य आहेत व ०१ सदस्य तटस्थ आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक सन्मा. सदस्य केशव घरत आणि अनुमोदक सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्तसाहेब, हा विषय अतिशय महत्वाचा आहे आणि हया विषयी मलासुध्दा माहिती नाही असे आपण अचानक सभागृहालासुध्दा सांगितले. आपण आपले विधी सल्लागार या ठिकाणी नेमलेले आहेत. ते या ठिकाणी नाहीत. आपण दोन दिवसांनी निर्णय देणार आहात. नंतर हा ठराव योग्य आहे की अयोग्य आहे हा निकाल नंतर लागणार आहे. ही जी महासभेमध्ये कार्यवाहीची पध्दत आहे. एकतर आपण ऑफिसर आयुक्त म्हणून जे नमुद केलेले आहेत. आपण या विषयाला तात्पुरती स्थगिती दिली पाहिजे असे आमचे मत आहे. आपण तसे न करता सभागृहात दोन्ही बाजूने लटकवून ठेवलेले आहे. परंतु, आपण व्यासपीठावर एक जबाबदार व्यक्ती आहात. ही जी गोष्ट घडलेली आहे. ती गोष्ट बरोबर वाटलेली नाही. याची या प्रोसीडिंगमध्ये नोंद करावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की ठराव झालेला आहे. मला फक्त दोन सुचना मांडायच्या आहेत. आमचा हेतु तुम्हाला विरोध करण्याचा नाही. आम्हाला सुचना मांडायच्या आहेत.मा. नामदार मंत्री महोदय गणेशजी नाईक यांच्या जनता दरबारात सांगितले होते की पाणी विभागासाठी मिरा भाईंदरने पाणी मागणी करावी या मिरा भाईंदरच्या पाणी प्रश्नासाठी मला दोन सुचना मांडायच्या आहेत. तुम्ही आमच्या मंत्री महोदयांचा अपमान करता का?

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इनको सबजेक्ट मे बोलने दिजिए । पीछे खडे रहते है ।

**चंद्रकांत मोदी :-**

पुरे मिरा भाईंदरमे पानी आ गया ।

**रतन पाटील :-**

साहेब, ऐका. तुम्ही मंत्री महोदयांचा अपमान करता. आम्ही बोलू देणार नाही. आम्ही मोर्चा आणू. उदया मंत्री महोदयांच्यासमोर मोर्चा आणू. मा. ना. मंत्री महोदय गणेशजी नाईक यांनी जनता दरबारात सांगितले होते की मिरा भाईंदरच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आज आपल्याला जे पाणी मिळते. आपली लोकसंख्या किती आहे. लोकसंख्या वाढत आहे या संदर्भात मिळणारे पाणी उदया कमी होणार आहे अशा पाण्यासाठी मागे जशी आंदोलने झाली. तशी आंदोलने होणार आहेत. त्यासाठी मा. मंत्री महोदयांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाच्या संदर्भात मिरा भाईंदर महापालिकेने तसा प्रस्ताव मांडा की नवी मुंबई महापालिकेकडून पाणी प्रस्ताव त्यांच्याकडूनच पाण्याची मागणी करा हा असा प्रस्ताव या सभेत संमत झाला पाहिजे. ही मागणी सर्वांची एकमताने मागणी झाली.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

लेकिन यह सबजेक्ट किधर है?

**रतन पाटील :-**

असा प्रस्ताव मांडून टाका. आम्ही मिरा भाईंदरच्या पाणी प्रश्नासाठी बोलतो.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

इससे पहलेही हम लोग पास कर चुके है । पहले मिटिंग मे पास कर चुके है ।

**रतन पाटील :-**

आम्ही मंत्री महोदयांकडे मोर्चा घेउन जाउ हे लक्षात ठेवा.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

यह प्रेझेन्टेशन कर रहे है । हम लोग इसके पहलेही पास कर चुके है ।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आणि मा. आयुक्तसाहेब आपण ऐकून घ्या.

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील धमकी दे रहे है ।

**रतन पाटील :-**

आम्ही धमकी देत नाही. आम्ही इशारा देतो. आम्ही मंत्री महोदयांच्यासमोर मोर्चा घेउन जाउ. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रश्न सोडवणार.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इसके पहले मिटिंग मे ज्यादा पानी मिलने के लिए मा. गणेश नाईकजी प्रस्ताव कर चुके है ।

**रतन पाटील :-**

याच्या अगोदरचा पाणी प्रश्न या लोकांनी जाळला.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इसके पहले मिटिंग मे मा. गणेश नाईकजी के संबंध मे हम लोगोने एक प्रस्ताव मतलब एक लेटर लिखा है की एक्स्ट्रा पानी हमको दिया जाए । यह बात बाद मे कर रहे है । हम लोग पहलेही लिख चुके है और अभी यह दुसरे प्रस्ताव का ठराव रखते है । दुसरा लेटर सौ एम.एल.डी. पानी का रखते है ।

**रतन पाटील :-**

हा प्रस्ताव विचाराधीन घ्या. आम्ही उदया मंत्री महोदयांकडे मोर्चा नेउ. तुम्हाला यायला लागेल हे लक्षात ठेवा. आम्हीसुध्दा गोंधळ घालू.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटीलसाहेब, आपण हा विषय पुढच्या सभेत विषयपटलावर आणून घेउया.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

लेकिन हम लोग यह पहलेही कर चुके है।

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की हा विषय नवी मुंबई महानगरपालिका आमच्या पक्षाचीच आहे. मंत्री महोदय आमच्या पक्षाचेच आहेत. तो निर्णय आम्ही आमच्या पक्षातर्फे याचा विचार आणू. तो आमच्या पक्षाचा निर्णय आहे. तुम्हाला हयाच्यामध्ये तोंड घालण्याची आवश्यकता नाही. भाईंदरला पाणी दयायची आमच्या पक्षाचीसुध्दा जबाबदारी आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (पाणी पुरवठा)

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्टेम प्राधिकरणाकडून प्रतिदिन ८१ दललि मंजुर कोटयातून पाणी पुरवठा होत आहे. महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार ५0 दललि पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेतील उपांगांची कामे चालू आहेत. सदरच्या उपांगास पुरक व नागरीकांना पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा करणेसाठी सक्षम वितरण व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच ग्रामपंचायत काळात शहरामध्ये त्यावेळच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार विविध व्यासाच्या सिमेंटच्या जलवाहिन्या टाकणेत आल्या होत्या. सदरच्या सिमेंटच्या जलवाहिन्या नवीन पाणी पुरवठा योजना अंशत: कार्यान्वित झाल्यावर पाण्याच्या दाबास टिकत नसल्याने वारंवार गळती होत आहेत. परिणामी नागरीकांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. म्हणून सदरच्या जलवाहिन्या आताच्या लोकसंख्येच्या मानाने व सद्यस्थितीतील पाण्याचा दाब विचारात घेऊन बदलणे आवश्यक आहे. करिता महानगरपालिका क्षेत्रात आवश्यक ठिकाणी जलवाहिन्या टाकणेसाठी व अस्तित्वातील सिमेंटच्या जलवाहिन्या बदलणेसाठी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन ०४-०५ सालातील चालू दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत. सदर अंदाजपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार झडपा, जोड साहित्य (मेकॅनिकल फिटींग), खोदाई, पाईप पुरवठा करून अंथरणे, जोडणे व यशस्वी दाबचाचणी देणे इ. बाबींचा समावेश करणेत आला आहे. तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील विविध जलवाहिनीतील पाण्याचा दाब समान राहण्यासाठी अस्तित्वातील जलवाहिन्यांना क्रॉस कनेक्शन करणेचाही प्रामुख्याने समावेश केला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भाईदर पश्चिम राई शिवनेरी येथे वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिनी अंथरणे | १००<br>१५०<br>२०० | १३७५<br>४००<br>२० | २८२१२००.०० |
| २ | भाईदर पश्चिम उत्तन पाली गाव येथे वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १००<br>१५० | १०००<br>५० | १४०९१००.०० |
| ३ | भाईदर पश्चिम उत्तन गाव येथे वितरण वितरण व्यवस्थेसाठी वाढीव जलवाहिनी अंथरणे. | १०० | १००० | ११८४०००.०० |
| ४ | भाईदर पश्चिम येथील गीता नगर ते गणेश मंदीर येथे जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५० | ७०० | ११५००००.०० |
| ५ | भाईदर पश्चिम येथील टेंभा रोड ते रेल्वे ओव्हर ब्रिज पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १५०<br>२०० | ४५०<br>९०० | २५३४१६०.०० |
| ६ | भाईदर पश्चिम येथे गणेश देवल नगर येथे नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ८०<br>१००<br>१५० | १०००<br>५००<br>२५० | १८५००००.०० |
| ७ | मिरा रोड येथे विजय पार्क परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २००<br>२५० | २००<br>३०० | १२०५४२५.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | व्यास (मी.मी) | लांबी (मी) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| ८ | मिरा रोड हटकेश परिसरात बिडाची जलवाहिनी अंथरणे | २५०<br>२०० | ८२०<br>२५० | ३१३८४००.०० |
| ९ | मिरा रोड (काशी) नित्यानंद नगर मध्ये बिडाची जलवाहिनी अंथरणे | २०० | ९०० | १६९२७३८.०० |
| १० | मिरा रोड परिसरात मिरा पंपींग स्टेशन ते एम.आय.डी.सी. सम्प पर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे | ३०० | ५५० | १८७८३३१.०० |
| ११ | भाईदर पुर्व परिसरात गोडदेव टाकी साईकृपा कॉम्पलेक्स ते गोडदेव स्मशान भुमी रोड पर्यंत बिडाची जलवाहिन्या अंथरणे. | ४००(M.S.)<br>४००<br>३५० | १२०<br>२३०<br>२५० | ३०९००५०.०० |
| १२ | मिरा रोड विभागात शितल नगरपरिसरात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>२५० | ५००<br>५००<br>१५० | १६३५९५०.०० |
| १३ | मिरा रोड शांती विद्या नगरी परिसराकरीता विभागात बिडाची जलवाहिनी अंथरणे. | ३००<br>२५० | ७५०<br>८२० | ४५७१७००.०० |
| १४ | काशी गावामध्ये जुन्या सिमेंटच्या जलवाहिन्या बदलून नवीन बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | १००<br>१५०<br>३०० | १०००<br>३००<br>२०० | २१५८७३५.०० |
| १५ | मिरा रोड येथे शांती पार्क विभागात बिडाच्या जलवाहिन्या अंथरणे. | २००<br>२५०<br>३०० | २००<br>५५०<br>४०० | ३०९०७१५.०० |

वरील विकास कामे अत्यावश्यक सेवेतील असून सदर विकास कामांना ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देऊन पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.तसेच यापुढे रू.५०.०० लक्ष रकमेपर्यंतची कामे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात यावीत व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसारच पुढील कार्यवाही करणेत यावी. असा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
४) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
५) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
६) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
७) श्री. शेख आसिफ गुलाब
८) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
९) श्री. नलावडे दिनेश द.
१०) श्री. पांडे हंसु कमलकुमार
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. माळी रविंद्र भीमदेव
१३) श्री. घरत केशव रामभाऊ
१४) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
१५) श्रीम. वाडे जिवी हिरा
१६) श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर
१७) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत

१८) श्री. पटेल आसिफ गुलाम
१९) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव
२०) श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
२१) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२२) श्री. खान शफीक अहमद
२३) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४) श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
२५) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२६) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२७) श्रीम. भामरे उर्मिला कोमल
२८) श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
२९) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
३०) श्री. मेहता नरेंद्र
३१) श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव
३३) श्री. पाटील रोहिदास आत्माराम

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्री. पाटील अनंत रामचंद्र
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. म्हात्रे मिलन वसंत
४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
६) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
७) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
९) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१०) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
११) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१२) श्री. पाटील रतन कृष्णा
१३) श्री. पाटील शरद केशव
१४) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१५) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
१६) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
१७) श्रीम. शाह रक्षा एस.
१८) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१९) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
२१) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
२२) श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस

**ठरावाच्या वेळी तटस्थ असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

२) श्रीम. रिटा सुभाष शाह

(हजर मा. सदस्यांपैकी ठराव मतदानाच्यावेळी एकूण ०७ सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते.)

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ३३ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २२ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०१ |
| एकूण सदस्य | :- | **५६** |

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०९ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. रविंद्र माळी ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एक लक्षात घ्या की यांना प्रस्ताव फेटाळण्याचा अधिकार कोणी दिला? आम्ही प्रथम बोलणार. आपण प्रथम होशमध्ये या. आपल्याला प्रस्ताव फेटाळण्याचा अधिकार नाही. मा. महापौर मॅडम, तुम्हाला आमचा पुकारा झालेला आहे. त्यांना बसू दया.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, हमारा प्रस्ताव आपने कभी यह किया है? और इसका डिसीजन कब लगा है?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेवकांना सांगा की प्रथम अभ्यास करा आणि नंतर प्रस्ताव रद्द करा. कोणाचे बोलणे सांगू नका. काहीतरी बोलले आणि उठले हा तुमचाच ठराव आहे. माझा स्थायी समितीचा ठराव नाही. तुम्ही पहिली कुठलीही गोष्ट करताना विचार करा. कुठल्याही गोष्टीला विचार केला पाहिजे. तुमच्या बुध्दिने ठराव घ्या आणि नंतर रद्द करा.

**महेन्द्रसिंग चौहाण :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल को क्या हो गया है? तुम्हारे पास बुध्दि है क्या?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मेरा प्रस्ताव नही लिया तो मै इधर उपोषण करुँगी ।

**मा. महापौर :-**

ठराव फेटाळयात आलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम ही कामकाजाची पध्दत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

डायसवरुन खाली कोणीलाही जाउ देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवसाहेब, आम्ही सभागृहाच्या बाहेर जाणार नाही. तुम्ही कुठल्या कायदयाने ठराव रद्द केला. तो कायदा सांगा.

**प्रकरण क्र. ०९ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - प्रशासकीय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ रद्द करुन नव्याने पदनिर्मिती करुन शासनाची मंजुरी घेणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६८)

**ठराव क्र. १३ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १०:-**

सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - संत गाडगेबाबा अभियाना अंतर्गत प्रभागाप्रमाणे नालेसफाई, गटारसफाई बाबत सादर केलेल्या अहवालावर महासभेत चर्चा करुन निर्णय घेणे. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६९)

**ठराव क्र. १४ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ११ :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा स्मारकासह सुशोभित करणे व स्थानिक स्वातंत्र्य सैनिकांची नावे फलकावर कोरुन स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक सुशोभित करणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७०)

**ठराव क्र. १५ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १२ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल (गाडोदिया) यांचे दिनांक ११/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - स्थायी समिती सभा दिनांक ०६/११/२००३ प्रकरण १५७, ठराव क्र. १३७, मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील इमारती, स्वतंत्र बंगले, स्वतंत्र मालकीची घरे यांना ज्या वर्षी नगरपालिका/महानगरपालिका यांनी सर्वात प्रथम कर आकारणी करुन घरपट्टी वसुल केली आहे त्या वर्षीचा निकष पकडून घरपट्टी लावणेबाबत. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७१)

**ठराव क्र. १५(अ) :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३ :-**

सन्मा. सदस्य श्री. केशव घरत यांचे दिनांक १३/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - घोडबंदर किल्ला पुरातत्व विभागाकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे. (मा. महासभा दि. १८/०२/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७२)

**ठराव क्र. १५(ब) :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव फेटाळण्यांत आला.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभागृह नेते, मा. प्र. सचिव, सर्व नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**